


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २६३ * नांदेड * शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# आता राजीनामा द्या; कॉकरोच जनता पार्टीचं मुंबईत आंदोलन

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी, शिवाजी पार्कात तुफान गर्दी



**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतातील लोकशाहीला अडचणीत आणणाऱ्या ज्ञानेश कुमार यांनी मुख्य निवडणूक आयुक्तपदाचा राजीनामा द्यावा, त्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही, अशी मागणी यावेळी दिपके यांनी केली. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा यासाठी सीजेपीने मुंबईत मोठं आंदोलन केलं. यावेळी अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

दि. २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी मुंबईतील छत्रपती शिवाजी पार्क येथे कॉकरोच जनता पार्टीच्यावतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनात मोठ्या संख्येने युवकांची उपस्थिती होती.

आंदोलनात अभिजीत दिपके म्हणाले, आज गांधी जयंतीच्या निमित्त आपण आपल्या अधिकारांसाठी लढत आहोत. यापेक्षा गांधीजींना मोठी श्रद्धांजली नाही. इंग्रजांनी जेवढं गांधीजींना त्रास दिला नसेल तेवढा त्रास हे संघाचे लोक आम्हाला दिला. त्यांना वाटत होतं की, गांधींना गोळी घालून त्यांचा विचार संपवू शकतील. पण गांधी कधी मरत नाहीत. गांधीजी हे या देशाचा आत्मा आहे. जोपर्यंत आमच्यासारखे युवक आहेत तोपर्यंत या देशात गांधीजी जिवंत राहतील. नथुराम गोडसेसारखे हजारो येतील आणि हजारो जातील. गांधीजींच्या विचाराने हा देश पुढे चालेल, असे ते म्हणाले.

### लाठीचार्जमुळे गर्दी पांगवू शकता, पण आमचे प्रश्न थांबवू शकत नाही –राहुल गांधी

मतदारांची नावे वगळणे आणि व्होटर लिस्टमध्ये कथित गैरव्यवहाराच्या विरोधात युवक व विरोधी पक्ष रस्त्यावर उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत जोरदार हल्लाबोल केला आहे. युवक व्होट चोरीविरोधात शांततेच्या मार्गाने, घटनात्मक अधिकारांचा वापर करत आंदोलन करत आहेत, मात्र तरीही त्यांच्यावर लाठीचार्ज केला जात आहे, अशा शब्दात राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला.

### सीजेपीच्या आंदोलनाला नेते–अभिनेत्यांचा पाठिंबा

दिल्लीनंतर आता महाराष्ट्राच्या राजधानीत कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू असून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. त्यासाठी, आज महात्मा गांधींच्या जयंतीदिनीच सीजेपीने मुंबईतील शिवाजी पार्कवर आंदोलन पुकारले असून मोठ्या संख्येनं तरुणाई आंदोलनात सहभागी होत आहे. विशेष म्हणजे, अभिनेत्री शर्लिन चोपडाने देखील सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होत पाठिंबा दर्शवला आहे. तर, ज्येष्ठ अभिनेते नसरुद्दीन शाह यांनीही सहभागी होत अभिजीत दिपकेचं कौतुक केलं.

# एमपीएससी पेपरफुटीविरोधात पुण्यात विद्यार्थी रस्त्यावर



**पुणे (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीमुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांनी तातडीने राजीनामा द्यावा, या मुख्य मागणीसाठी पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर विद्यार्थ्यांनी गुरुवारी सायंकाळपासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी स्वतः रात्रभर विद्यार्थ्यांसोबत या आंदोलनात सहभाग घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सचिवाची बदली आणि अध्यक्षांची न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर काही सदस्यांनी २ ऑक्टोबरचे आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले होते. मात्र, गुरुवारी सायंकाळी पुण्यातील इंदुलाल कॉम्प्लेक्स येथे झालेल्या बैठकीत बहुतांश परीक्षार्थ्यांनी अध्यक्षांच्या तडकाफडकी राजीनाम्याची मागणी लावून धरली. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी मान्य न झाल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा घेतला.

### एमपीएससीचे सचिव हरपाळकर यांना हटवले

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावर उठलेले वादळ आणि पुण्यात विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अत्यंत मोठा निर्णय घेतला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांना सचिव पदावरून कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांची मूळ विभागात बदली करण्याचे आदेश राज्य शासनाने जारी केले आहेत. दोन वर्षांपूर्वी महेंद्र हरपाळकर यांची एमपीएससीच्या सचिवपदी प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, पेपरफुटीच्या आरोपनंतर विद्यार्थ्यांच्या वाढत्या आक्रोशामुळे आणि मागणीनुसार सरकारने त्यांची बदली केली आहे.

# दिल्लीत निवडणूक आयोगाविरोधात आंदोलन; ५०० जण पोलिसांच्या ताब्यात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची आणि निवडणूक आयोगाच्या कामकाजावर आक्षेप घेणाऱ्या विविध संघटना व राजकीय पक्षांच्या आंदोलनामुळे राजधानी दिल्लीतील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. दिल्लीतील ऐतिहासिक जंतर–मंतर परिसरात आंदोलन करणाऱ्या निदर्शकांना पोलिसांनी ताब्यात घेत संपूर्ण परिसर मोकळा केला आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी पोहोचलेले आम आदमी पार्टीचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष आणि नेते सौरभ भारद्वाज यांच्यासह ५०० कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आज राजधानी दिल्लीतील जंतरमंतरवर मोठा राजकीय संग्राम पाहायला मिळाला. 'कॉकरोच जनता पार्टी' सह विविध विरोधी पक्षांच्या आव्हानानंतर आंदोलक जंतरमंतरवर जमा झाले होते. मात्र, दिल्ली पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारत अवघ्या काही मिनिटांतच संपूर्ण परिसर रिकामा केला.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; सात जणांचा मृत्यू, १८ जण जखमी

**अमरावती (प्रतिनिधी)–** समृद्धी महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. नवरात्रौत्सवासाठी दुर्गादेवीची मूर्ती आणायला गेलेल्या तरुणांवर काळानं झडप घातली आहे. या दुर्दैवी अपघातात सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर बारा जण जखमी झाले आहेत.

अमरावती जिल्ह्याच्या धामणगाव पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या समृद्धी महामार्गावर टाटाएस गाडीचा भीषण अपघात झालाय. शेगाव येथून दुर्गा देवीची उंच मूर्ती नवरात्रौत्सवासाठी आणली जात असताना दुर्गा माता मंडळातील तरुण सदस्यांचा हा भीषण अपघात झालाय. या अपघातात बारा जण




गंभीर जखमी झाले असून सात जणांचा यात दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे. मध्यरात्री एक वाजताच्या सुमारात ही घटना घडल्याच्या प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वर्ध्याच्या सिंदी मेघे परिसरात राहणारे सर्व असून जखमींना वर्ध्याच्या सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात बारा गंभीर जखमी, तर पाच किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. दरवर्षी सिंदी मेघे येथील दुर्गा माता मंडळाचे सदस्य देवीची मूर्ती शेगाव येथून आणतात. यावेळी देखील शेगाव येथून मूर्ती आणण्याकरिता हे मंडळ शेगाव येथे गेले होते. शेगाव येथून समृद्धी महामर्गाने मूर्ती घेऊन परत येत असताना हा अपघात घडला आहे. या घटनेनं सिंदी मेघे परिसरात शोक पसरला असून मंडळातील सदस्यांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गाने बोलेरो पीक अप गाडीने शेगाव येथून मूर्ती आणली जात होती. दरम्यान धामणगाव जवळ रात्रीच्या सुमारास बोलेरो गाडीला कंटेनरने मागावून धडक दिली. परिणामी मूर्ती असलेली बोलेरो पीक अप गाडीला जोरदार धडक बसली. तर मूर्तीसोबत चारणारे मंडळाचे सदस्य या अपघातात चिरडले गेले, तर काही गंभीररित्या जखमी झाले आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह धामणगाव नगराध्यक्ष अर्चना रोठे, अमरावती जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, विशेष पोलीस महानिरीक्षक महेश पाटील घटनास्थळी आणि नंतर रुग्णालयात जाऊन परिस्थितीची पाहणी केली.

# महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. नागपूर पदवीधर मतदार संघासाठी अभिजीत वंजारी यांना पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरीकडे पुणे मतदारसंघातून जयंत आसगावकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर अमरावती शिक्षक मतदार संघामधून अपेक्षेप्रमाणे आदिती पोहोरे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

राज्यात सध्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यामध्ये आता काँग्रेसने आघाडी घेतल्याचं दिसून येत आहे. काँग्रेसकडून विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये नागपूर पदवीधर मतदार संघासाठी पुन्हा एकदा अभिजीत वंजारी यांनाच संधी देण्यात आली आहे. तर पुणे मतदारसंघातून जयंत आसगावकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दुसरीकडे अमरावती शिक्षक मतदार संघामधून आधीच आदिती पोहोरे यांचं नाव जवळपास निश्चित झालं होतं.

# मुखेडमध्ये दुष्काळासाठी रास्ता रोको

## माजी जि.प. अध्यक्ष बेटमोगरेकरांच्या नेतृत्वात ४ तास महामार्ग रोखला

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासनाकडून मुखेड तालुका दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीतून वगळण्यात आला आहे. या निर्णयाविरोधात मुखेडमध्ये ४ तास रास्ता रोको करण्यात आला. यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

यंदा मुखेड तालुक्यात अत्यंत कमी पाऊस झाल्याने उभी पिके वाळून गेली आहेत. नदी, नाले, ओढे, तलाव, विहिरी कोरड्या पडल्या असून बोअरवेल व हातपंपही आटण्याच्या मार्गावर आहेत. असे असतानाही २०२६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर–१ च्या दुष्काळ



यादीतून मुखेड तालुक्याला वगळण्यात आले आहे. या विरोधात माजी जि.प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली आणि शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांच्यासह शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोरील राज्य महामार्गावर ४ तास रास्ता रोको करण्यात आला. यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती.

यावेळी शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात रोष व्यक्त करत ट्रिगर –१ मध्ये मुखेडचा समावेश करा, पीकविमा मंजूर करा, शेतमजुरांना अनुदान द्या, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करा, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा, २४ तास वीज द्या, घरकुलाचे बिल तात्काळ द्या, चारा–पाण्याचा प्रश्न सोडवा आदी मागण्या केल्या. या आंदोलनात विविध पक्ष, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक व शेतकरी बैलगाड्या आणि जनावरांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मागण्या मान्य न झाल्यास दि. ५ ऑक्टोबरपासून बेमुदत साखळी उपोषण आणि त्यानंतरही निर्णय न झाल्यास कुटुंब व गुरेढोरांसह भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा बेटमोगरेकर व कलंबरकर यांनी दिला आहे.

# भारतीय महिलांची सुवर्ण कामगिरी! हॉकी संघानं रचला इतिहास, तबब्ल ४४ वर्षानंतर सुवर्णपदक, आता ऑलिम्पिकसाठीही पात्र



**टोकिओ (वृत्तसंस्था)–** भारतीय महिला हॉकी संघाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला हॉकी संघाने अंतिम सामन्यात चीनला १–० ने पराभूत करुन सुवर्णपदक जिंकले आहे. यासह, भारतीय महिला हॉकी संघाने २०२८ च्या ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली आहे. १९८२ नंतर प्रथमच भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला हॉकीमधील भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे. ४४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. ऐची–नागोया येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने गतविजेत्या चीनला १–० ने पराभूत केले. या विजयासह, भारताने लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली आहे. चार दशकांहून अधिक काळाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर संघासाठी हा एक ऐतिहासिक दिवस आहे.

भारतीय संघाने पहिल्याच क्वार्टरमध्ये आघाडी घेतली. लालरेम्सियामीने भारतासाठी एकमेव गोल केला. हा गोल भारताच्या विजयासाठी पुरेसा ठरला. त्यानंतर, दोन्ही संघांना आणखी गोल करता आले नाहीत. अशाप्रकारे, भारतीय संघाने गतविजेत्यांचा १–० ने पराभव केला.

सामन्याच्या दुसऱ्या सत्रात चीनने अत्यंत आक्रमक खेळ केला आणि भारतीय संघावर सतत दबाव ठेवला. जेव्हा चीनला पेनल्टी स्ट्रोक मिळाला, तेव्हा त्यांना सामना बरोबरीत आणण्याची सर्वात मोठी संधी मिळाली. भारताची अनुभवी गोलरक्षक सविता पुनियाने उत्कृष्ट बचाव करत चीनला गोल करण्यापासून रोखले.

### आशियाई स्पर्धेत भारताला एकाच दिवसात ६ सुवर्णपदकांसह १० पदके

जपानमधील ऐची–नागोया येथे सुरू असलेल्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत शुक्रवारी भारतीय ॲथलीट्सनी ऐतिहासिक कामगिरी करत नवा इतिहास रचला आहे. भारताने एकाच मिनिटात तब्बल २ सुवर्णपदके जिंकण्याचा अनोखा पराक्रम केला असून संपूर्ण दिवसात भारताच्या खात्यात एकूण १० पदके जमा झाली आहेत. या १० पदकांमध्ये तब्बल ६ सुवर्णपदके, २ रौप्यपदके आणि २ कांस्यपदकांचा समावेश आहे. या ऐतिहासिक कामगिरीसह भारताच्या एकूण पदकांची संख्या आता ७६ वर पोहोचली आहे.




# ३३ आदिवासी जमातींवरील अन्यायाविरोधात नांदेडमध्ये मूक आंदोलन; गांधी जयंती दिनी वजिराबाद येथे निदर्शने



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील ३३ अन्यायग्रस्त आदिवासी जमातींवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालय समोर मूक आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून अहिंसेच्या मार्गाने हे आंदोलन वजिराबाद येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर दुपारी १ वाजता पार पडले. गेल्या काही काळापासून या ३३ जमातींच्या हक्कांकडे दुर्लक्ष होत असून त्यांच्यावरील अन्याय वाढत चालला आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात युनायटेड ट्रायबल सोशल जस्टिस संघटना, महाराष्ट्रचे अध्यक्ष अतुल पेदेवाड, सचिव सुनील टिपरसे यांच्यासह लक्ष्मण ठकरवाड, सुरेश अंबुलगेकर, मारोती कंठेवाड, प्रवीण जेठेवाड, देवराव टिप्परसे, दिलीप बास्टेवाड, बालाजी इंगेवाड, रावसाहेब गाडेवाड, नामदेव सुरबुलवाड, गिरीश भाटे, ओम पोगुलवाड, अक्षय मुपडे, रावसाहेब पुपलवाड, भगवान कोलगाणे, शिवराज चितळे, किरण पडलवार, पप्पू काळेवाड, राजू नाईकवाड, संतोष पल्लेवाड, अशोक इंगेवाड, शिवराम बोधगिरे, गिरीश गुर्लेवाड, सुभाष पडलवार, स्वप्नील बोनलावार, प्रमोद बास्टेवाड व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'एल निनो'च्या वाढत्या तीव्रतेमुळे यंदा हिवाळ्यातही उष्णतेचा त्रास?

**मुंबई (प्रतिनिधी)–** यंदा प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीचा प्रभाव जागतिक हवामानावर असून अनेक देशांना सध्या तीव्र हवामान बदलाचा सामना करावा लागत आहे. ऑक्टोबरपासून 'एल निनो' स्थितीची तीव्रता वाढण्याचा अंदाज जगभरातील हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये वाढत्या उष्णेतचा सामना करावा लागणार आहेच. मात्र, एल निनोचा प्रभाव २०२७ च्या सुरुवातीपर्यंत कायम राहण्याचा अंदाज असून त्यामुळे यंदाचा हिवाळाही अधिक त्रासदायक ठरण्याची चिन्हे आहेत.

यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र होता. महाराष्ट्राचा विचार करता यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यात दीर्घकाळ उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम होती. विदर्भ आणि मराठवाड्यात याचा सर्वाधिक त्रास होता. तर कोकण प्रदेशातील काही जिल्ह्यातील नागरिकांनाही यावर्षी उष्णेतचा दाह अधिक सहन करावा लागला. यंदा मान्सुनही जूनच्या अखेरीस दाखल झाल्याने जूनच्या पंधरवड्यातही उन्हाचा त्रास सहन करावा लागला.

नुकताच देशातील मान्सूनचा हंगाम संपल्याची घोषणा हवामान विभगाकडून करण्यात आली. गेल्यावर्षी सरासरीहून अधिक पाऊस झाला होता. यंदा मात्र देशात १३ टक्के इतकी पावसाची तूट असून राज्यात हेच प्रमाण १९ टक्के इतके आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शाळेतील स्वच्छतागृहांचा प्रश्न कधी सुटणार?

एखादा देश आपल्या मुलांना भविष्यासाठी सक्षम करण्याची तयारी करीत असल्याचा दावा करीत असेल, तर त्या मुलांना शाळेत साधे सुरक्षित आणि वापरण्यायोग्य स्वच्छतागृह उपलब्ध आहे का, हा प्रश्न सर्वप्रथम विचारला पाहिजे. शिक्षण म्हणजे केवळ वर्गखोल्या, पाठ्यपुस्तके, डिजिटल साधने किंवा शिक्षकांची उपलब्धता नव्हे. मुलांना सन्मानाने आणि सुरक्षित वातावरणात शिकता यावे, यासाठी मूलभूत सुविधा असणेही तितकेच आवश्यक आहे. मात्र, जगभरातील कोट्यवधी शालेय विद्यार्थ्यांना आजही या मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफच्या संयुक्त देखरेख कार्यक्रमांच्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये जगभरातील सुमारे २४ कोटी ४० लाख शालेय वयाच्या मुलांना त्यांच्या शाळेत कोणतीही स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध नव्हती. त्यापैकी सुमारे पाच कोटी मुले भारतातील आहेत. म्हणजेच जगातील अशा मुलांपैकी जवळपास पाचपैकी एक मूल भारतातील आहे. ही आकडेवारी केवळ धक्कादायक नाही, तर शिक्षण व्यवस्थेच्या प्राधान्यक्रमांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. भारताने स्वच्छता क्षेत्रात निश्चितच प्रगती केली आहे. २०१५ ते २०२५ या दशकात स्वच्छतागृह सुविधांपासून वंचित असलेल्या शाळांचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र, टक्केवारीतील सुधारणा आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती यामध्ये मोठी दरी राहू नये. शाळेत स्वच्छतागृह बांधले आहे एवढेच पुरेसे नाही. ते स्वच्छ, सुरक्षित, पाण्याची उपलब्धता असलेले, वापरण्यायोग्य आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार असणे आवश्यक आहे. विशेषतः मुलींसाठी शाळेतील स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृह हा केवळ सुविधा उपलब्धतेचा विषय नाही, तर त्यांच्या शिक्षणातील सातत्य आणि आत्मसन्मानाशी निगडित प्रश्न आहे. मासिक पाळीच्या काळात योग्य सुविधा नसल्यामुळे मुलींना शाळेत गैरसोय सहन करावी लागू शकते. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची रचना त्यांच्या वापरास योग्य नसेल, तर सुविधा असूनही ती प्रत्यक्षात निरुपयोगी ठरते. त्यामुळे शाळेतील स्वच्छता ही आरोग्य, उपस्थिती, सुरक्षितता आणि समान संधी यांच्याशी थेट जोडलेली आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये शिक्षण आणि स्वच्छता यांना स्वतंत्र उद्दिष्टे मानले असले, तरी त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात परस्परांशी जोडलेली आहे. गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षणासाठी सुरक्षित शालेय वातावरण आवश्यक आहे, तर स्वच्छता आणि पाण्याच्या सुविधांशिवाय असे वातावरण पूर्ण होऊ शकत नाही. आता भारतासमोरचे आव्हान 'शाळेत स्वच्छतागृह बांधले' या मानसिकतेतून बाहेर पडून 'शाळेत कार्यक्षम स्वच्छता सेवा उपलब्ध आहे' याकडे जाण्याचे आहे. कुलूपबंद स्वच्छतागृह, पाण्याची जोडणी नसलेली सुविधा, तुटलेली व्यवस्था किंवा आडोशाचा अभाव असलेले स्वच्छतागृह कागदोपत्री उपलब्ध असले, तरी विद्यार्थ्यांसाठी त्याचा उपयोग काय? जगभरातील सध्याच्या प्रगतीचा वेग कायम राहिला, तर २०३० पर्यंत केवळ ८१ टक्के शाळांमध्ये मूलभूत स्वच्छता सुविधा उपलब्ध होण्याचा अंदाज आहे. सर्व शाळांना ही सुविधा देण्यासाठी प्रगतीचा वेग तब्बल पाचपट वाढवावा लागणार आहे. भारतासाठीही ही बाब गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे. शाळा स्वच्छता अभियानाचा भर केवळ बांधकामावर न राहता नियमित देखभाल, पाणीपुरवठा, स्वच्छता, मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा आणि स्थानिक पातळीवरील उत्तरदायित्वावर असायला हवा. प्रत्येक शाळेत स्वच्छतागृह दररोज वापरण्यायोग्य आहे की नाही, याची जबाबदारी निश्चित व्यक्तीवर असली पाहिजे. शेवटी, शाळेतील स्वच्छतागृह हा विकासाचा किरकोळ भाग नाही, तो मुलांच्या सन्मानाचा आणि शिक्षणाच्या गुणवत्तेचा आरसा आहे. स्वच्छतागृहांची संख्या किती बांधली, यापेक्षा किती मुले प्रत्यक्षात सुरक्षित आणि सन्मानाने त्यांचा वापर करू शकतात, हेच कोणत्याही स्वच्छता अभियानाच्या यशाचे खरे मोजमाप ठरले पाहिजे.

# अभिजात मराठीचा वारसा: संशोधनात्मक चिकित्सा



केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' अधिकृत दर्जा दिला आणि मराठीच्या मुकुटात एक मानाचा तुरा रोवला गेला. हाच ऐतिहासिक सोहळा साजरा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. हा केवळ एक सरकारी निर्णय किंवा दिनविशेष नाही; तर हा मराठी भाषिकांच्या अस्मितेचा आणि प्रदीर्घ लढ्याचा विजयोत्सव तर आहेच पण माझ्यासारख्या संशोधकाच्या दृष्टीने पाहता, हा दिवस केवळ उत्सवाचा नसून मराठीच्या समृद्ध वारशाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची संधी आहे. हा दिवस मराठीवरील प्रेम सोबतच तिच्या ज्ञानपरंपरेचा अभ्यास करण्याची प्रेरणा देणारा व मराठीच्या उज्ज्वल भविष्यासाठीची जबाबदारीही अधोरेखित करतो.

**मराठी भाषेचा विकास**

मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही; ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, संस्कृतीची, विचारपरंपरेची आणि लोकजीवनाची साक्ष देणारी समृद्ध भाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या प्रदीर्घ साहित्यपरंपरेचा नव्याने विचार करण्याची संधी निर्माण झाली आहे. या परंपरेचा मागोवा घेताना तेराव्या शतकातील महानुभाव पंथाचे योगदान विशेषत्वाने अधोरेखित होते. भाषेचा विकास हा एका दिवसात घडणारा प्रवास नसतो. अनेक पिढ्यांच्या विचार, लेखन आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीतून भाषा समृद्ध होत जाते. मराठीच्या बाबतीतही हेच दिसून येते. तेराव्या शतकात महानुभाव पंथाने मराठीचा वापर धार्मिक विचार, तत्त्वज्ञान, चरित्र, काव्य आणि लोकजीवनाच्या अभिव्यक्तीसाठी केला. त्यामुळे मराठीला ज्ञान आणि साहित्याच्या क्षेत्रात भक्कम स्थान मिळण्यास मोठी मदत झाली.

**लोकभाषेला ज्ञानभाषेचे स्थान**

तेराव्या शतकातील महाराष्ट्रात धार्मिक आणि तात्त्विक विचारांच्या अभिव्यक्तीत संस्कृत भाषेला महत्त्वाचे स्थान होते. अशा काळात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी सामान्य माणसापर्यंत विचार पोहोचवण्यासाठी लोकभाषेचा स्वीकार केला. त्यांच्या उपदेशातून आणि संवादातून मराठीचा प्रभावी वापर झाला.महानुभाव पंथातील विचारवंत आणि अनुयायांनी मराठीतून लेखन केले. त्यामुळे धार्मिक आणि तात्त्विक विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अधिक व्यापक झाला. हा बदल केवळ भाषेपुरता मर्यादित नव्हता. ज्ञान आणि विचार हे समाजातील अधिकाधिक लोकांपर्यंत त्यांच्या परिचित भाषेत पोहोचावेत, या दृष्टिकोनाला त्यातून बळ मिळाले. मराठीच्या पुढील ज्ञानभाषा म्हणून झालेल्या विकासाच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा आहे.

**'लीळाचरित्र': मराठी गद्याची सुरुवात**

मराठीच्या आद्य वाययपरंपरेचा विचार करताना महानुभाव पंथातील दोन साहित्यकृती विशेषत्वाने अधोरेखित कराव्या लागतात, ते म्हणजे म्हाइंभटांचे 'लीळाचरित्र' आणि महदंबांचे 'धवळे'. 'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य चरित्रग्रंथ आणि गद्यग्रंथ म्हणून विशेष महत्त्वाचा मानला जातो. श्री चक्रधर स्वामींच्या जीवनातील प्रसंग, त्यांचे विचार आणि तत्कालीन समाजजीवन यांचे चित्रण करणाऱ्या या ग्रंथाने मराठी गद्याला एक सुसंगत साहित्यिक रूप दिले.

'लीळाचरित्र' हा ग्रंथ म्हाइंभटांनी संकलित केला. 'लीळाचरित्रा'मुळे मराठी गद्याला एक सुसंगत आणि प्रभावी रूप मिळाले. धार्मिक आणि तात्त्विक विचारांबरोबरच तत्कालीन समाजजीवन, रूढी, व्यवहार, प्रवास, लोकांच्या सवयी आणि दैनंदिन जीवन यांचे चित्रण या ग्रंथात आढळते. म्हणूनच 'लीळाचरित्र' हा केवळ धार्मिक ग्रंथ म्हणून पाहता येत नाही. तेराव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठीही तो महत्त्वाचा साहित्यिक स्रोत आहे. याच परंपरेत महदंबांचे 'धवळे' हे मराठीतील आद्य स्त्री-काव्यपरंपरेतील महत्त्वाचे असून, त्याला आद्य पद्यग्रंथ म्हणूनही गौरवले जाते. त्यांच्या काव्यातून तत्कालीन समाजजीवन, स्त्रीचे भावविश्व आणि लोकभाषेतील अभिव्यक्ती यांचे दर्शन घडते. त्यामुळे मराठीच्या आरंभीच्या पद्यपरंपरेत 'धवळे'चे स्थान वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**गद्य-पद्याची समृद्ध परंपरा**

महानुभाव पंथाचे योगदान केवळ गद्यलेखना-पुरते मर्यादित राहिले नाही. या परंपरेत तत्त्वज्ञान, चरित्र, कथा आणि काव्य अशा विविध साहित्यप्रकारांचा विकास झाला. 'स्मृतिस्थळ', केसोबासांचे 'सूत्रपाठ' यांसारख्या ग्रंथांनी मराठी गद्य आणि तात्त्विक लेखनाची परंपरा समृद्ध केली. त्याचबरोबर महानुभाव कवींनी मराठी पद्यालाही महत्त्वपूर्ण योगदान दिले. कवि नरेंद्र यांचे 'रुक्मिणी स्वयंवर', भास्करभट्ट बोरीकर यांचे 'शिशुपालवध' आणि 'उद्धव-गीता', दामोदर पंडितांचे 'वच्छाहरण' तसेच नारायण व्यासांचे 'ऋद्धिपूरवर्णन' हे ग्रंथ या समृद्ध परंपरेचे प्रतिनिधित्व करतात. या साहित्यामधून तत्कालीन मराठी भाषेची शब्दसंपदा, अभिव्यक्तीची क्षमता आणि काव्यात्मकता लक्षात येते. त्यामुळे तेराव्या शतकातील मराठी ही साहित्यनिर्मितीसाठी सक्षम आणि विकसित होत असलेली भाषा होती, याची जाणीव होते. या साहित्याकडे पाहताना त्यातील धार्मिक आशयाबरोबरच भाषिक आणि बौद्धिक परंपरेचाही विचार करणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानासारखा अमूर्त विषय मराठीत मांडण्याची क्षमता या साहित्यामधून दिसून येते.

**हस्तलिखितांचे जतन: सांकेतिक लिपींची परंपरा**

महानुभाव साहित्याची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे ग्रंथांचे जतन करण्यासाठी वापरल्या गेलेल्या सांकेतिक लिपींची परंपरा. महानुभाव पंथाच्या साहित्या-मध्ये सकळ लिपी, सुंदरी लिपी, अंक लिपी अशा विविध लिपींचा वापर झाल्याचे संशोधनातून समोर आले आहे. या लिपींमुळे पंथाचे साहित्य दीर्घकाळ सुरक्षित राहण्यास मदत झाली. ज्या पद्धतीने साहित्य एका विशिष्ट परंपरेत सुरक्षित ठेवण्यासाठी लिपीचा वापर झाला, त्याच लिपी आज संशोधकांसाठी ऐतिहासिक भाषावैज्ञानिक साधन बनल्या आहेत. नंतरच्या काळात या लिपींचा अभ्यास करून संशोधकांनी महानुभाव साहित्याचा मोठा ठेवा अभ्यासकांसमोर आणला. वि. का. राजवाडे आणि डॉ. वि. भि. कोलते यांसारख्या संशोधकांच्या कार्यामुळे या साहित्यपरंपरेच्या अभ्यासाला नवे आयाम मिळाले. आजही महानुभाव पंथातील अनेक हस्तलिखिते, ग्रंथ आणि साहित्यसंपदा संशोधनासाठी महत्त्वाची आहे. त्यांचे जतन, संपादन आणि प्रकाशन आधुनिक वाचकांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

**स्त्रीच्या लिखाणालाही मिळाले स्थान**

महानुभाव पंथाच्या साहित्यपरंपरेत स्त्रीच्या सहभागाचे स्थानही उल्लेखनीय आहे. महदाइसा अर्थात महदंबा या सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या शिष्येने केलेली साहित्यनिर्मिती विशेष महत्त्वाची मानली जाते. 'धवळे' या रचनांमधून स्त्रीच्या भावविश्वाला आणि तिच्या अनुभवविश्वाला मराठीतील साहित्यिक अभिव्यक्ती मिळाली. त्यामुळे मध्ययुगीन मराठी साहित्याच्या इतिहासात स्त्रीच्या लेखनपरंपरेचा विचार करताना महदंबांचे योगदान महत्त्वाचे ठरते. भाषा तेव्हाच व्यापक होते, जेव्हा तिच्यात समाजातील विविध घटकांना आपले अनुभव व्यक्त करता येतात. या दृष्टीने महानुभाव साहित्यपरंपरेचा अभ्यास आजही अर्थपूर्ण आहे. यातून एक व्यापक बाब लक्षात येते, भाषेची समृद्धी केवळ साहित्यप्रकारांच्या संख्येने होत नाही; समाजातील विविध घटकांना त्या भाषेत आपले अनुभव व्यक्त करता येतात का? यावरही तिचे सांस्कृतिक वैभव अवलंबून असते.

**अभिजात मराठी आणि आपली जबाबदारी**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठीच्या प्राचीन साहित्यपरंपरेचा अभ्यास करण्याला नवे महत्त्व प्राप्त झाले आहे. हा दर्जा केवळ गौरवाचा विषय न राहता संशोधन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत साहित्य पोहोचवण्याची संधी ठरली पाहिजे. महानुभाव पंथाच्या साहित्याचा मोठा भाग हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहे. या साहित्याचे शास्त्रीय संपादन, डिजिटल जतन, भाषांतर आणि प्रकाशन नव्या पिढीसाठी करण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठे, संशोधन संस्था, ग्रंथालये आणि साहित्यिक संस्थांनी यासाठी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ', 'स्मृतिस्थळ' आणि महानुभाव परंपरेतील विविध काव्यग्रंथांचा अभ्यास केवळ धार्मिक किंवा पंथीय चौकटीत न करता मराठी भाषा, साहित्य, समाज आणि सांस्कृतिक इतिहासाच्या व्यापक संदर्भात व्हायला हवा.

**वारसा आणि नवा दृष्टिकोन**

मराठीच्या अभिजाततेचा विचार करताना केवळ प्राचीनत्वाचा अभिमान पुरेसा नाही. त्या प्राचीन साहित्याचा अभ्यास, त्याचे संवर्धन आणि आधुनिक समाजाशी त्याचा संवाद घडवून आणणे तितकेच महत्त्वाचे आहे. महानुभाव पंथाने तेराव्या शतकात मराठीचा वापर करून विचार मांडले, ग्रंथ लिहिले आणि साहित्याची समृद्ध परंपरा निर्माण केली. त्या कार्यामुळे मराठीच्या आरंभीच्या वाययीन वाटचालीला भक्कम आधार मिळाला. आजच्या अभिजात भाषा गौरव दिनाचे खरे औचित्य आपल्या भाषेच्या इतिहासाचा अभिमान बाळगतानाच, तिच्या अभिजाततेचा खरा अर्थ केवळ प्राचीनतेचा अभिमान नव्हे; तर त्या प्राचीन वारशाचे चिकित्सक आकलन करून त्याला भविष्याशी जोडणे हा आहे. मराठीचा हा समृद्ध वारसा जतन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हाच अभिजात भाषा गौरव दिनाचा खरा अर्थ ठरू शकतो.

**-डॉ. गोपाळ मोहनराव कदम,**
मु. पो. लिंबगाव (रे. स्टे.), ता. जि. नांदेड
मो. ९७०४४२१००५

# माय मराठी अभिजात भाषेची थोरवी

३ ऑक्टोबर हा दिवस माय मराठी भाषेसाठी अत्यंत आनंदाचा दिवस आहे. कारण या दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला 'अभिजात भाषा' म्हणून मंजुरी दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारताचे पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देताना तिची प्राचीनता, समृद्ध साहित्यपरंपरा, ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व विचारात घेण्यात आले. तसेच मराठीची मुळे प्राचीन असून तिची साहित्यिक परंपरा एक हजार वर्षांहून अधिक जुनी आहे. भाषाविषयक तज्ज्ञ व तमाम मराठी मातृभाषिक लोकांच्या मागणीला शासनाने मान्यता दिली अन् मराठीला अभिजात भाषा म्हणून अधिकृत मान्यता मिळाली. म्हणूनच ३ ऑक्टोबर हा मराठी भाषेच्या अभिजात दर्जाच्या निर्णयाचा ऐतिहासिक दिवस म्हणून नोंद आहे. अर्थात दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्र सरकारने 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच संपूर्ण शाळा, महाविद्यालयात मराठी अभिजात भाषा गौरव दिन उत्साहात साजरा केला जात आहे. यावरून तीर्थामध्ये काशी - व्रतांमध्ये एकादशी भाषामध्ये तैशी - मराठी शोभिवंत या उक्तिप्रमाणे मराठी भाषिकांच्या भावविश्वात मराठी भाषेचे स्थान किती महत्वाचे आहे याची प्रचिती येते.

मातृभाषा मराठी ही मराठी माणसांच्या जीवनातील अंधकार दूर करून ज्ञानाची ज्योत पेटविणारी मशाल आहे. अशा या मराठीची थोरवी गाताना फादर स्टिफन्स असे म्हणतात की,

जैसी पुष्पामाजी पुष्प मोगरी
की परिमळामाजी कस्तुरी
तैसी भासांमाजी साजिरी मराठिया

असा मराठी भाषेचा महिमा अगाध आहे. आज जागतिकीकरण, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावी रेट्यातही



मराठी भाषा तग धरून आहे.तिचे भाषिकदृष्ट्या कार्य अविरतपणे सुरूच आहे.मराठी ही सार्वजनिक व्यवहाराची,व्यवसायाची व रोजगाराभिमुख भाषा आहे.

मराठी भाषेवर इंग्रजी,संस्कृत, कन्नड, हिंदी, जर्मन, पोर्तुगीज, अरबी, फारशी अशा जगाच्या पाठीवरील अनेक भाषांचे आक्रमण होत आहे, या भाषांतील अनेक शब्दांचा शिरकाव मराठी भाषेत होत आहे.त्यामुळे मराठी भाषेत इतर भाषेतले अनेक शब्द आले आहेत.त्यामुळे मराठी भाषिकांनी मराठी भाषेची शुध्दता जपून ठेवण्यासाठी प्रत्येकांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे.मराठी भाषेचा आग्रह मनाशी बाळगला पाहिजे. कारण महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या प्रदेशातील भाषांचा प्रभावही मराठी भाषेवर जोमाने होत आहे,त्याकडेही लक्ष दिले पाहिजे.

आज 'मराठी' भाषा व मराठी विषयाची गोडी वाढविणे ही आधुनिक काळाची गरज आहे.कारण आज इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणामुळे आपल्या पाल्यांना इग्रंजी माध्यमाच्या शाळेत घातले जात आहे. म्हणून मराठी माणसांनी आपल्या जीवनव्यवहारात मराठीला दुय्यम स्थान न देता प्रथम स्थान दिले पाहिजे.याशिवाय राजकीय नेतृत्वानी अभिजात मराठी भाषेसंदर्भात योग्य अंमलबजावणी केली पाहिजे.वाचन संस्कृतीचीही जोपासणा झाली पाहिजे.मराठी मुलुखात मराठी भाषिकांनी दर्जेदार मराठी साहित्य निर्मिती केली पाहिजे. अभ्यासक्रमात मराठी भाषेच्या अध्यापन व अध्ययनाविषयी जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे.पालक व विद्यार्थ्यांनी मराठी भाषेसंदर्भात जागरूक असले पाहिजे. मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्याबाबत प्रयत्न केले पाहिजेत. आज महाराष्ट्रात सेट, नेट उत्तीर्ण होऊन आणि एम. फिल., पीएच. डी. यासारख्या मोठ्या पदव्या मराठी भाषेत मिळवूनसुध्दा नोकऱ्या लागत नाहीत.त्यामुळे अनेक मराठी भाषिक बेकार तरूणाईंची फौज निर्माण झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक मराठी भाषिक शाळेत,विद्यापीठात, महाविद्यालयात बेरोजगार तरूणांना नोकऱ्या शासनानी दिल्या पाहिजेत,यावर विचार मंथन झाले पाहिजे.अशा या मराठी भाषेसंदर्भात मराठी भाषिकांनी चिंतन, मनन करणे ही काळाची गरज आहे, त्या दृष्टिकोनातून उपाययोजना केल्या पाहिजेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आणि शासनदरबारी तिची योग्य दखल घेतली गेली. परंतु अभिजात भाषा म्हणून अंमलबजावणी करतांना मराठीचे संवर्धन व मराठी भाषाभिवृध्दीसाठी पुस्तक प्रकाशन व नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे, कामकाजाची व ज्ञानभाषा म्हणून मराठीचा वापर करणे,बँकक्षेत्र, कृषी, न्याय, संगणक, रेल्वे, शिक्षण, पोस्ट अशा सर्वांगीण क्षेत्रात, प्रशासकीय व्यवहारात मराठी भाषेचा वापर करणे आदीं बाबींकडे लक्ष दिले पाहिजे.प्रसारमाध्यमांनीही मराठी भाषेचा जागर तेवत ठेवला पाहिजे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, फादर स्टिफन्स, सुरेश भट आदी संत व लेखकांनी मायबोली मराठी भाषेचा गोडवा गायीला, तोच वारसा आजच्याही पिढीने पुढे घेऊन गेला पाहिजे.म्हणजेच, सुरेश भट यांनी म्हटल्याप्रमाणे,

लाभले आम्हास भाग्य
बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य
ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

अशी भूमिका मराठी भाषिकांनी ठेवली पाहिजे. याचबरोबर इंग्रजी ही ज्ञानार्जन व जगाशी संवाद साधण्याची भाषा असली तरी मराठी भाषिकांनी तिच्या नादात मातृभाषा मराठीला विसरता कामा नये. मराठी भाषेत ज्ञानाचे भांडार अवाढव्य आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र आत्मचरित्र, लघुनिबंध, प्रवासवर्णन अशा सर्वच वाङ्:मय प्रकारात नवोदित पिढीतील लेखकांनी सृजनशील साहित्यनिर्मिती केली पाहिजे. मराठी भाषेसंदर्भात सक्षम चळवळी उभ्या केल्या पाहिजेत.मराठी साहित्य परिषद, वाङ्:मयसंस्था आणि संघटनांनी आपली भूमिका चोख पाळली पाहिजे. सर्व विद्याशाखात मराठीचे ज्ञान दिले पाहिजे.मराठी भाषेला सातासमुद्रापलीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मराठी भाषाभिवृध्दीसाठी वेगवेगळे ग्रंथ, कोशनिर्मिती करून त्याचा प्रचार व प्रसार केला पाहिजे. चांगल्या ग्रंथाना पुरस्कार मिळाले पाहिजेत, ग्रंथ प्रकाशकांनी केवळ पैसा हा हेतू डोळ्यासमोर न ठेवता उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीला चालना दिली पाहिजे. वि. दा. सावरकर, माधवराव पटवर्धन, श्री. कृ. कोल्हटकरांची भाषाशुध्दीची चळवळ पुढे नेली पाहिजे. याशिवाय मराठी भाषाभिवृध्दीसाठी मराठी भाषेत संशोधनाला चालना, मराठी विषय सक्तीचा, मराठी भाषा वापरासंदर्भात समाजप्रबोधन, संगणकासाठी मराठी-भाषेचा वापर, मराठीचे विविध उपक्रम, मराठी भाषेसंदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा व शिबिराचे आयोजन केले पाहिजे, तरच भाषेला नवा साज चढेल. अशा या अमृताशी पैंजा जिंकणाऱ्या अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा सर्वजण जपूया या अपेक्षेसह!

**-डॉ. शेटकार रामशेट्टी**
मराठी विभाग
दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

# पितृपक्ष आणि श्राद्धकर्म

सध्या पितृ पंधरवडा सुरु आहे. आपले जवळचे नातेवाईक ज्या तिथीला निर्वर्तले असतील,पितृपक्षातील त्या तिथीला त्यांच्यासाठी घास ठेवण्याचा प्रघात मागील हजारो वर्षांपासून चालत आला आहे. 'पितृपक्ष', 'श्राद्ध' म्हटले की, हल्लीच्या विज्ञानयुगातील तरुण पिढीच्या मनात 'अशास्त्रीय आणि अवास्तव कर्मकांडाचे अवडंबर', अशी त्याविषयीची चुकीची प्रतिमा उभी रहाते. धर्मशिक्षणाचा अभाव, अध्यात्म समजून घेण्याविषयीची अनास्था, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, धर्मद्रोही संघटनांकडून हिंदु धर्मातील प्रथा-परंपरा यांवर सातत्याने होणारी द्वेषमूलक टीका इत्यादींचा हा परिणाम आहे. श्राद्धाविषयी पुढीलसारखी विचारसरणीही समाजात आढळून येते. पूजाअर्चा, श्राद्धपक्ष यांवर विश्वास न ठेवणारे किंवा समाजकार्यच सर्वश्रेष्ठ आहे, असे म्हणणारे, 'पितरांसाठी श्राद्धविधी न करता त्याऐवजी गरिबांना अन्नदान करू किंवा शाळेला मदत करू', असे म्हणतात! त्याप्रमाणे कित्येक जण करतातही! असे करणे म्हणजे, 'एखाद्या रोग्यावर शस्त्रक्रिया न करता त्याऐवजी आम्ही गरिबांना अन्नदान करू, शाळेला मदत करू', असे म्हणण्यासारखे आहे.

श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म शक्ती सामावलेली असल्याने श्राद्धविधीतून पितरांना गती मिळणे शक्य होते; म्हणून वरील विधाने हास्यास्पद ठरतात. हिंदु धर्माने सांगितलेल्या ईश्वरप्राप्तीच्या मूलभूत सिद्धांतांपैकी एक म्हणजे 'देवऋण, ऋषीऋण, पितृऋण आणि समाजऋण ही चार ऋणे फेडणे' होय. यांपैकी पितृऋण फेडण्यासाठी पितरासाठी श्राद्धविधी करणे आवश्यक असते. भारतीय संस्कृती असे सांगते की, ज्याप्रमाणे माता-पिता, तसेच निकटवर्तीय हयात असतांना त्यांची सेवाशुश्रूषा आपण धर्मपालन म्हणून करतो, त्याप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याप्रती आपले काहीतरी कर्तव्य असते. त्या कर्तव्यपूर्तीची आणि त्याद्वारे पितरऋण फेडण्याची सुसंधी श्राद्धकर्मामुळे मिळते. लहानपणी तळहातावरील फोडाप्रमाणे आपल्याला जपणाऱ्या आपल्या मातापित्यांचा मृत्योत्तर प्रवास हा सुखमय आणि क्लेशरहित व्हावा, त्यांना सद्गती मिळावी यासाठी श्राद्धविधी आवश्यक असतो. श्राद्ध न केल्यास पितरांच्या इच्छा अतृप्त राहिल्यामुळे, तसेच असे वासनायुक्त पितर कुटुंबियांना त्रास देण्याची शक्यता अधिक असते. श्राद्धविधीमुळे पितरांची या त्रासांतून मुक्तता होऊन आपले जीवनही सुसह्य होते. विशिष्ट वार, तिथी आणि नक्षत्र यांना श्राद्ध केल्याने पितृकर्म होण्याबरोबरच विशिष्ट फलप्राप्तीही होते.

**श्राद्धासंबंधी प्राचीन ग्रंथांतील संदर्भ**

हिंदु धर्मामध्ये मृत पितरांना पुढची गती मिळावी, यासाठी श्राद्धविधी करण्यास सांगितला आहे. श्राद्ध न केल्यास कोणते दोष संभावतात, याचेही वर्णन विविध धर्मग्रंथांत आले आहे.

**ऋग्वेद**-त्वमग्न ईळितो जातवेदोऽ
वाङ्ढव्यानि सुरभीणि कृत्वी।
प्रादाः पितृभ्यः स्वधया ते
अक्षन्नद्धि त्वं देव प्रयता हवींषि ।।

ऋग्वेद, मण्डल १०, सूक्त १५, ऋचा १२

अर्थ : हे सर्वज्ञ अग्निदेवा, आम्ही तुझी स्तुती करतो. तू आम्ही दिलेले हे हवनीय द्रव्य सुगंधित करून आमच्या पितरांना पोहोचव. आमचे पितर स्वधा म्हणून दिलेल्या हवनीय द्रव्याचे भक्षण करोत. हे देवा, तूसुद्धा आम्ही प्रयत्नपूर्वक अर्पण केलेल्या या हविर्भागाचे भक्षण कर.

**कूर्मपुराण**-अमावास्यादिने प्राप्ते गृहद्वारं समाश्रिताः ।
वायुभूताः प्रपश्यन्ति श्राद्धं वै पितरो नृणाम् ।।
यावदस्तमयं भानोः क्षुत्पिपासासमाकुलाः ।
ततश्चास्तङ्गते भानौ निराशादुःखसंयुताः ।।
निःश्वस्य सुचिरं यान्ति गर्हयन्तः स्ववंशजम् ।
जलेनाऽपि च न श्राद्धं शाकेनापि करोति यः ।।
अमायां पितरस्तस्य शापं दत्वा प्रयान्ति च ।।

**कूर्मपुराण**-अर्थ : (मृत होऊन) वायूरूप झालेले पितर अमावास्येच्या दिवशी आपल्या वंशजांच्या घरी येऊन आपल्याला श्राद्ध वाढले जात आहे का, हे पहातात. सूर्य मावळेपर्यंत तहान-भुकेने (अतृप्त वासनांमुळे) व्याकुळ झालेले पितर श्राद्ध न मिळाल्याने सूर्यास्त झाल्यावर निराश होतात आणि दुःखी निःश्वास टाकून स्वतःच्या वंशजांना चिरकाल दोष देतात. अशा वेळी जो पाण्याने अथवा भाजी-नेही श्राद्ध वाढत नाही, त्याला अमावास्येच्या दिवशी त्याचे पितर शाप देऊन निघून जातात.

आदित्यपुराण
न सन्ति पितरश्चेति कृत्वा मनसि वर्तते ।
श्राद्धं न कुरुते यस्तु तस्य रक्तं पिबन्ति ते ।।
आदित्यपुराण

अर्थ : मेल्यावर पितरांचे अस्तित्व नसते, असा विचार करून जो श्राद्ध करत नाही, त्याचे रक्त त्याचे पितर पितात.

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# गोदावरी नदी घाटावर मनपा आयुक्तांच्या उपस्थितीत भव्य सामूहिक श्रमदान संपन्न

## स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत मनपाची मोहीम



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वच्छता ही सेवा या देशव्यापी अभियानांतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने बुधवार, दि. १ ऑक्टोबर रोजी एक दिवस, एक तास, एक साथ या संकल्पनेवर आधारित विशेष सामूहिक श्रमदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली गोदावरी नदी घाटावर ही भव्य स्वच्छता मोहीम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे राबवण्यात आली. नदी घाटाचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या मोहिमे अंतर्गत सकाळी ठीक ८ वाजता गोदावरी नदीच्या गोवर्धन घाटावरून या मोहिमेला सुरुवात झाली. मनपा आयुक्त, मनपाचे सर्व वरिष्ठ अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, आणि शेकडो स्वच्छता कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष हातात झाडू आणि टोपले घेऊन श्रमदानात सहभाग घेतला. या मोहिमेअंतर्गत नदी घाटावरील प्लास्टिक कचरा, निर्माल्य, सुका व ओला कचरा, तसेच काठावर साचलेली घास-पाचोळी पूर्णपणे हटवून परिसराचा कायापालट करण्यात आला. गोळा झालेला कचरा मनपाच्या घंटागाड्या आणि कचरा वाहतूक वाहनांद्वारे तात्काळ विल्हेवाटीसाठी पाठवण्यात आला.

एक दिवस, एक तास, एक साथ या आवाहनाला प्रतिसाद देत केवळ मनपाचे अधिकारी व कर्मचारीच नव्हे, तर शहरातील विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरणप्रेमी नागरिक, तरुण आणि महिलांनीही या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सर्वांनी मिळून एकाच वेळी एक तास श्रमदान करून संपूर्ण घाट परिसर चकाचक केला. या मोहिमेत विशेष करून स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला होता. मोहिमेची सांगता सामुहिक स्वच्छता शपथ घेऊन करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना मनपा आयुक्तांनी सांगितले की, गोदावरी नदी ही नांदेडची जीवनवाहिनी आहे. तिचे पावित्र्य आणि स्वच्छता राखणे ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नांदेडकराचे कर्तव्य आहे. 'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या माध्यमातून आपल्याला शहराला कचरामुक्त करायचे आहे. नागरिकांनी नदीपात्रात किंवा घाटावर कचरा टाकू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे.

या विशेष स्वच्छता मोहिमेला मनपाचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त नितीन गाढवे, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, क्रिडा व सांस्कृतिक अधिकारी रमेश चवरे, उपअभियंता प्रकाश कांबळे, खुशाल कदम, क्षेत्रिय अधिकारी रावण सोनसळे, नागनाथ पतंगे, राजेश जाधव, गौतम कवडे, विठ्ठल तिडके, मुख्य स्वच्छता निरीक्षक वासीम तडवी, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, तसेच विविध विभागाचे कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मान, हक्क व आरोग्यासाठी नांदेड येथे विशेष कार्यशाळा

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त नांदेड येथे ज्येष्ठ नागरिक कार्यशाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड आणि महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मराठवाडा प्रादेशिक विभाग (उत्तर), नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक कार्यशाळेचे येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या नियोजन भवन येथे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी संजीव मोरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान व आदर करण्याबाबत उपस्थितांनी सामूहिक शपथ घेतली.

समाज कल्याणचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी प्रास्ताविकात 'मातृ देवो भव, पितृ देवो भव' ही भारतीय संस्कृतीची शिकवण असून ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाच्या विविध पेन्शन योजनांची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री वयोश्री योजना आणि मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेबाबत शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. विविध शासकीय विभाग व बँकांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या कामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुकेवार यांनी महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली. शहरात चार विरंगुळा केंद्रे, विविध ठिकाणी वाचन कट्टे तसेच महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती त्यांनी दिली.

जिल्हा अग्रणी बँकेचे मुख्य व्यवस्थापक बी. जी. सोनकांबळे यांनी ज्येष्ठ नागरिकांना बँकिंग व्यवहारात अडचणी येऊ नयेत यासाठी बँकांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे सांगितले. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देणे तसेच निवृत्तीवेतनधारकांना हयातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत माहिती दिली. डिजिटल फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करत कोणत्याही व्यक्तीस ओटीपी देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

फिजिओथेरपी तज्ज्ञ डॉ. सुमेधकुमार वाघमारे यांनी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत सुलभ व्यायामाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. समुपदेशक ज्योती पिंपळे यांनी अवयवदान, नेत्रदान व देहदानाबाबत माहिती दिली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उपाध्यक्ष अशोक तेरकर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांवर मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी विविध उपक्रम व योजनांमध्ये त्यांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे यांनी नव्या पिढीने ज्ञान, विज्ञान आणि संस्कारांची जोपासना करण्याबरोबरच घरातील ज्येष्ठांचा सन्मान केला पाहिजे, असे सांगितले. ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर तरतुदींची माहिती असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महाउपलब्धी ॲपची माहिती देण्यासाठी मंगळवारी कार्यशाळेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनविषयक सेवा जलद, सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महा-उपलब्धी मोबाईल ॲपबाबत माहिती देण्यासाठी मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

वित्त विभागाच्या दि. १९ जून रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आलेल्या मोबाईल ॲपच्या विविध सुविधांची माहिती निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना व्हावी यासाठी ॲपच्या वापराबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई हे ऑनलाइन माध्यमातून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

# मुखेडमध्ये शिवसेनेची आढावा बैठक; 'गाव तेथे शाखा, शाखा तेथे शिवसैनिक'चा निर्धार

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्यासाठी मुखेड येथे दि. ३० सप्टेंबर रोजी आढावा बैठक उत्साहात पार पडली. लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोद्दार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

आगामी काळात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक आक्रमकपणे करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी पदाधिकाऱ्यांना संघटन मजबूत करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. गाव तेथे शाखा आणि शाखा तेथे शिवसैनिक या भूमिकेतून प्रत्येक गावात पक्षाची मजबूत



शाखा उभी करून शिवसेनेची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोद्दार यांनी शिवसेना बांधणी, पदाधिकाऱ्यांची सक्रियता आणि तळागाळातील जनतेशी संपर्क वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्षविस्तारासाठी जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रकाश मारावार, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, सहसंपर्कप्रमुख भागवत जाधव, डॉ. सुनील पाटील कदम, युवासेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील, अल्पसंख्याक विभागाचे जैनुद्दीन पटेल, शिवाजी वाडीकर, मन्मथ खंकरे, शंकर पिटलेवाड, विजय मंगलगे, जब्बार पटेल, विश्वनाथ वंजे, पप्पू पाटील, योगेश मामीलवाड, शिवराज भुरे, शिवराज सिद्दमवाड, सुभाष श्रीमंगले, बालाजी कदम, प्रकाश वन्नाळे, बालाजी सोनकांबळे, किशन पाटील सिरामे, बालाजी यलमटवाड, विठ्ठल दबडे, परसराम गवाले, मकदूम साब, हनमंत हुगेवाड यांच्यासह बहुसंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# सफाई मित्रांसाठी आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वच्छता ही सेवा सफाई मित्र सुरक्षा सेवा तथा सन्मान शिबिराच्या अंतर्गत, ३० सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड विभागातील सात ठिकाणी सफाई मित्रांसाठी व्यापक आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. ही शिबिरे मुख्य वैद्यकीय अधीक्षक, नांदेड, डॉ. एम. के. श्रीनिवास यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.

ही आरोग्य तपासणी शिबिरे हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानक, विभागीय रेल्वे रुग्णालय नांदेड, उपविभागीय रुग्णालय पूर्णा, आरोग्य केंद्र अकोला, छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक, नगरसूल रेल्वे स्थानक आणि आरोग्य केंद्र आदिलाबाद येथे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये एकूण ११९ सफाई मित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

हुजूर साहिब नांदेड रेल्वेस्थानकावर विभागीय वैद्यकीय अधिकारी, नांदेड डॉ. दुर्गा प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात २९ सफाई मित्रांनी सहभाग घेतला. यामध्ये रक्तदाब, सामान्य रँडम रक्तातील साखर, उंची, वजन तसेच वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान २ सफाई मित्रांना मधुमेह आणि २ सफाई मित्रांना उच्च रक्तदाब असल्याचे निदान झाले.

विभागीय रेल्वे रुग्णालय, नांदेड येथे वरिष्ठ विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा यांनी सफाई मित्रांची आरोग्य तपासणी केली. उपविभागीय रुग्णालय, पूर्णा येथे २३ सफाई मित्रांची, तर आरोग्य केंद्र अकोला येथे १५ सफाई मित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर २२ सफाई मित्रांची, तर नगरसूल येथे ११ सफाई मित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरोग्य केंद्र, आदिलाबाद येथे १२ सफाई मित्रांची आरोग्य तपासणी केली. यापैकी २ सफाई मित्रांना उच्च रक्तदाब असल्याचे निदान झाले.

## वारकरी संप्रदायाच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी ह.भ.प. कचरू महाराज गाढे यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** वारकरी संप्रदाय नाशिक मंडळाच्यावतीने भोगाव (ता. अर्धापूर) येथील ह.भ.प. कचरू महाराज गाढे यांची वारकरी संप्रदाय नांदेडच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना याबाबतचे नियुक्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

वारकरी संप्रदायाच्या उद्देश, रचना व कार्यपद्धतीनुसार कार्य करण्याची तयारी दर्शविल्याने तसेच मंडळाच्या नियम व नियमावलीचे पालन करण्याच्या संमतीच्या आधारे ही नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय तथा जिल्हाध्यक्ष ह.भ.प. अण्णासाहेब आहेर हिसवळकर यांच्या शिफारशीनुसार कचरू महाराज गाढे यांची पुढील पाच वर्षांसाठी अथवा राष्ट्रीय अध्यक्षांच्या पुढील आदेशापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी वारकरी संप्रदाय नाशिकचे राष्ट्रीय तथा जिल्हाध्यक्ष ह.भ.प. अण्णासाहेब आहेर हिसवळकर तसेच वारकरी संप्रदाय नांदेडचे जिल्हाध्यक्ष ह. भ. प. शेषराव महाराज सूर्यवंशी यांनी कचरू महाराज गाढे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## लोहा बसस्थानकात महिलेचे दीड तोळे सोने व रोख रक्कमेची सापडलेली पर्स शेतकऱ्याने केली परत



**लोहा (प्रतिनिधी)–** आजकाल धावपळीच्या काळात व कलीयुगात अजूनही माणुसकी जीवंत आहे याचे उदाहरण लोहा येथील बसस्थानकातील पहायला मिळाले. फरकंडा ता. पालम जि. परभणी येथील महिला नामे गिता वैजनाथ पौळ या महिलेची दीड तोळा सोन्याची एकदानी किंमत अंदाजे २ लाख २० हजार रुपये व रोख दीड हजार रुपये त्याचसोबत आधार कार्ड असलेली पर्स खांबेगाव ता. लोहा, जि. नांदेड येथील शेतकरी मधुकर उमाजी हिलाल व त्यांचे मित्र नारायण कोचर रा. ढगे पिंपळगाव ता. लोहा यांना सापडली. त्यांनी लोहा बसस्थानकातील मेस्कोचे सुरक्षा रक्षक शेख लतीफ यांना सांगितले. तेव्हा सदरील महिलेला तिची ओळख पटवून दागिने व रोख रक्कम लोहा पोलरस स्टेशन येथे डीवायएसपी जुमडे व पोलीस निरीक्षक अरविंद घोडके यांच्या हस्ते परत केले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या समन्वयातून मदर तेरेसा शांतिनिकेतनमध्ये पुनर्वसन

**नांदेड (प्रतिनिधी)–** उपचारानंतर अनोळखी व निराधार रुग्णाला सुरक्षित निवारा, काळजी आणि आधार मिळवून देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी येथील औषध वैद्यकशास्त्र विभागाने माणुसकीचा संवेदनशील परिचय दिला. विभागाच्या पुढाकारातून सुमारे ६० वर्षीय रुग्णाचे मदर तेरेसा होम शांतिनिकेतन, मालटेकडी, नांदेड येथे सुरक्षितपणे पुनर्वसन करण्यात आले.



सदर रुग्णास दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा शासकीय रुग्णालय, हिंगोली येथून १०८ रुग्णवाहिकेद्वारे पुढील उपचारासाठी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी, नांदेड येथील औषधवैद्यकशास्त्र विभागातील कक्ष क्र. ३४ मध्ये दाखल करण्यात आले होते.

उपचारादरम्यान रुग्णाकडून मिळालेल्या माहितीनुसार तो हिंगोली जिल्ह्यातील औंढा तालुक्यातील बेरुळा येथील रहिवासी असल्याचे समोर आले. त्यानुसार दि. २० ऑगस्ट रोजी पोलीस ठाणे औंढा नागनाथ यांच्याशी पत्रव्यवहार करून रुग्णाच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात आला. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार रुग्णाचे त्या ठिकाणी वास्तव्य असले तरी त्याची देखभाल व काळजी घेण्यासाठी जबाबदार नातेवाईक उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले.

रुग्णाच्या उपचारानंतरच्या स्थितीचा तसेच त्याच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून त्याला सुरक्षित निवारा व पुढील काळजीची आवश्यकता असल्याने मशिनरीज ऑफ चॅरिटी, मदर तेरेसा होम शांतिनिकेतन, मालटेकडी, नांदेड यांच्याशी संपर्क साधण्यात आला. संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर रुग्णाच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात आली.

दि. २९ सप्टेंबर रोजी औषध वैद्यकशास्त्र विभागाच्या पथकाने रीतसर डिस्चार्ज प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेद्वारे वाहनचालक आवराळे व कक्ष सेवक मारुती राठोड यांच्यासमवेत रुग्णास मदर तेरेसा शांतिनिकेतन येथे सुरक्षितपणे दाखल करण्यात आले.

या पुनर्वसन प्रक्रियेस अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे तसेच औषधवैद्यकशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. शीतल राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) संतोष मुंगल यांनी संबंधित विभाग, पोलीस प्रशासन आणि मदर तेरेसा शांतिनिकेतन यांच्यात समन्वय साधून पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण केली.

## गोकुंदा येथे रांगोळी प्रदर्शन; सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजन

**किनवट (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा संकल्प अभियान अंतर्गत भारतीय जनता पार्टी किनवट-माहूरचे आ. भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली गोकुंदा, किनवट येथे बुधवार, दि. ३० रोजी रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील प्रदर्शन भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस तथा रांगोळी जिल्हा संयोजक संध्या राठोड यांच्या नेतृत्वात आणि तालुका रांगोळी प्रदर्शन संयोजक भावना दीक्षित यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते सोपानराव केंद्रे, शहराध्यक्ष स्वागत आयनेनीवार, जय वर्मा, सागर शिंदे, मनीषा चौधरी, सुजाता तोटावार, जया कनाके, साहिल भवर, आदित्य वाघमारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# 'माहिती अधिकार दिन' उत्साहात साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता दि. २८ सप्टेंबर हा दिवस राज्यस्तरावर दरवर्षी माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड या कार्यालयात माहिती अधिकार दिन' चे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यालयाचे अधिष्ठाता, डॉ. सुधीर देशमुख हे होते. कार्यक्रमाची सुरुवात व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांचे स्वागत डॉ. मुकुंद कुलकर्णी, प्रथम अपिलीय अधिकारी, माहिती अधिकार तथा सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग यांनी केले. डॉ. हेमंत गोडबोले, उपअधिष्ठाता तथा विशेष कार्य अधिकारी यांचे स्वागत संजय वाकडे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महाविद्यालय विभाग यांनी केले. डॉ. शितल राठोड, उपअधिष्ठाता तथा प्राध्यापक व विभागप्रमुख, औषधवैद्यकशास्त्र विभाग यांचे स्वागत भीमराव परोडवाड, सहायक जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, रुग्णालय विभाग यांनी केले. डॉ. अजय वराडे, उपवैद्यकीय अधीक्षक तथा सहयोगी प्राध्यापक, जीवरसायनशास्त्र विभाग यांचे स्वागत मारोती दुरफुले, सहायक जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाविद्यालय विभाग यांनी केले. डॉ. मुकुंद कुलकर्णी, प्रथम अपिलीय अधिकारी, माहिती अधिकार तथा सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग व डॉ. अनिल देगांवकर, प्राध्यापक व विभागप्रमुख, शल्यचिकीत्सा शास्त्र विभाग यांचे स्वागत किशोर भांगे, लघुलेखक, माहिती अधिकार कार्यासन यांनी केले तर संजय वाकडे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांचे स्वागत प्रशांत पाठक, वरिष्ठ सहायक यांनी केले.

या कार्यक्रमास डॉ. कांतीलाल चंडालिया, डॉ. वैशाली इनामदार, डॉ. किशोर राठोड, डॉ. मोहम्मद समीर, डॉ. वंदना दुधमल, डॉ. कपिल मोरे, डॉ. पंकज कदम, डॉ. उध्दव माने, डॉ. शिवानंद देवसरकर, सतीश इंगळे, बालाजी बोधगिरे, मारोती बुरफुले, भीमराव परोडवाड, प्रशांत पाठक आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते डॉ. मुकुंद कुलकर्णी, प्रथम अपिलीय अधिकारी, माहिती अधिकार तथा सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी या कायद्यातील विविध कलमे, प्रकरणे इ. विस्तृतपणे विशद करुन अगदी सोप्या भाषेत या कायद्याविषयी माहिती सांगितली. माहितीचा अर्ज कसा करावा, तद्नंतर प्रथम व द्वितीय अपिल कसे व किती कालावधीत कोणाकडे करावे, अर्ज शुल्क, माहितीचे शुल्क कसे व कोणाकडे भरणा करावे, माहिती किती दिवसात द्यावी, माहिती किती प्रकारची असते, त्रयस्थ पक्ष म्हणजे काय इ. बाबींचा त्यांनी उहापोह केला. तसेच त्यांनी नमुद केले की, सदर कायदा हा नागरीकांना प्रशासनाच्या कामकाजाबाबत माहिती मिळवून देणारा महत्त्वपूर्ण कायदेशीर अधिकार प्रदान करतो.प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्र-गोवा नोटरी असोसिएशनच्या भोकर तालुकाध्यक्षपदी ॲड. शिवाजी कदम नागापूरकर



**भोकर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र ॲन्ड गोवा नोटरी असोसिएशनच्या भोकर तालुका अध्यक्षपदी भोकर येथील विधिज्ञ ॲड. शिवाजी कदम नागापूरकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे अधिकृत पत्र असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष सय्यद सिकंदर अली व नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. दिलीप गंगातीर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या निवडीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास नांदेड अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर, माजी बार कौन्सिल मेंबर ॲड. अण्णाराव पाटील, विदर्भ प्रमुख नोटरी असोसिएशनचे ॲड. अनिल, तसेच भोकर येथील ॲड. बालाजी सूर्यवंशी, ॲड. प्रदीप लोखंडे, ॲड. गायकवाड यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील नोटरी, वकील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

ॲड. शिवाजी कदम नागापूरकर यांच्या कायदेविषयक कार्याचा तसेच विधी क्षेत्रातील अनुभवाचा विचार करून त्यांच्यावर भोकर तालुक्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

CMYK

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# पॉवर बँक ठेवताना सावधान; चुकीच्या ठिकाणी ठेवल्यास आगीचा धोका

**मोबाइलची बॅटरी संपल्यानंतर तातडीने चार्जिंगची सुविधा देणारे पॉवर बँक आज अनेकांच्या दैनंदिन वापरातील महत्त्वाचे उपकरण बनले आहे. मात्र, पॉवर बँक वापरताना किंवा साठवताना केलेली निष्काळजीपणा धोकादायक ठरू शकतो. विशेषतः लिथियम-आयन बॅटरी असलेल्या पॉवर बँकला अतितापमान, नुकसान किंवा अयोग्य वापरामुळे आग लागण्याचा धोका असतो. त्यामुळे पॉवर बँक कुठे ठेवायचा आणि त्याची काळजी कशी घ्यायची, हे जाणून घेणे आवश्यक आहे.**



## या चार चुका टाळा

- » उन्हात किंवा बंद वाहनात पॉवर बँक ठेवणे : पॉवर बँक थेट सूर्यप्रकाशात किंवा उन्हात उभ्या असलेल्या कारमध्ये ठेवणे टाळावे. बंद वाहनातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढू शकते. त्यामुळे पॉवर बँक अतितप्त होऊन बॅटरीला धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः उन्हाळ्यात ही काळजी अधिक महत्त्वाची आहे.
- » चार्जिंगदरम्यान त्यावर उशी किंवा चादर ठेवणे : पॉवर बँक चार्ज होत असताना त्यावर उशी, चादर, कपडे किंवा अन्य वस्तू ठेवणे धोकादायक ठरू शकते. चार्जिंगच्या वेळी उपकरण गरम होऊ शकते. त्याभोवती हवा खेळती न राहिल्यास उष्णता वाढू शकते. त्यामुळे पॉवर बँक चार्ज करताना तो मोकळ्या आणि उष्णता सहज न अडकणाऱ्या पृष्ठभागावर ठेवावा.
- » खराब किंवा फुगलेला पॉवर बँक वापरत राहणे : पॉवर बँक पडल्याने त्याच्या आतील भागाचे नुकसान होऊ शकते. तसेच बॅटरी फुगलेली दिसत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशा अवस्थेतील पॉवर बँक वापरणे किंवा चार्ज करणे टाळावे. नुकसान झालेल्या उपकरणाची तपासणी किंवा योग्य विल्हेवाट लावण्यासाठी अधिकृत सेवा केंद्राचा सल्ला घेणे सुरक्षित ठरते.
- » अतिशय स्वस्त आणि निकृष्ट दर्जाचा पॉवर बँक खरेदी करणे : कमी किमतीच्या उत्पादनाच्या नादात अज्ञात किंवा निकृष्ट दर्जाचा पॉवर बँक घेणे टाळावे. विश्वासार्ह उत्पादकाचे आणि आवश्यक सुरक्षा मानके पूर्ण करणारे उत्पादन निवडणे महत्त्वाचे आहे. अतिशय स्वस्त उत्पादनांमध्ये अपेक्षित दर्जाची सुरक्षा व्यवस्था असेलच असे नाही.

## पॉवर बँक कुठे ठेवावा?

पॉवर बँक थंड, कोरड्या आणि हवेशीर ठिकाणी ठेवावा. त्यावर थेट सूर्यप्रकाश पडणार नाही, याची काळजी घ्यावी. त्याच्या आसपास कपडे, कागद, चादरी किंवा सहज पेट घेणाऱ्या वस्तूंचा पसारा ठेवू नये. पॉवर बँक लाकडी कपाटातील बंद कप्प्यात ठेवण्यापेक्षा मोकळ्या आणि सहज आग न पकडणाऱ्या पृष्ठभागावर ठेवणे अधिक सुरक्षित आहे. तसेच चार्जिंग करताना त्याला झाकून ठेवू नये. पॉवर बँक नियमित वापरात नसल्यास तो पूर्णपणे रिकामा ठेवण्याऐवजी सुमारे ५० टक्के चार्ज करून साठवण्याचा सल्ला दिला जातो.

## तर 'या' गोष्टी तपासा

- » पॉवर बँक वापरताना तो नेहमीपेक्षा जास्त गरम होत आहे का, याकडे लक्ष द्या. असामान्य प्रमाणात तापत असल्यास त्याचा वापर थांबवून त्याची तपासणी करावी.
- » पॉवर बँक पडला असेल किंवा त्याला धक्का बसला असेल, तर त्याची बाह्य स्थिती तपासा. आतून काहीतरी सैल झाल्याचा किंवा तुटल्याचा आवाज येत असल्यास तो वापरू नये.
- » पॉवर बँक ठेवण्यासाठी घरात स्वतंत्र जागा निश्चित करणेही उपयुक्त ठरते. त्या ठिकाणी ज्वलनशील वस्तू नसाव्यात. तसेच पॉवर बँक चार्ज करताना त्याच्याभोवती इतर उपकरणे किंवा वस्तूंचा पसारा ठेवणे टाळावे.
- » पॉवर बँक हे उपयुक्त उपकरण असले तरी त्यातील बॅटरीची सुरक्षितता दुर्लक्षित करता कामा नये. योग्य पद्धतीने वापर आणि साठवणूक केल्यास अनावश्यक धोका टाळता येऊ शकतो.



# iPhone मधील छोट्या 'i'चा नेमका अर्थ काय? जाणून घ्या खरी कहाणी

**आयफोनची जगभरात मोठी लोकप्रियता आहे. नवीन आयफोन खरेदी करण्यासाठी रांगेत उभे राहणारे असंख्य चाहते आहेत. मात्र, आयफोनच्या नावातील छोट्या 'i' चा नेमका अर्थ काय, हे फार कमी जणांना माहीत आहे. अनेकांना 'i' म्हणजे इंटरनेट असे वाटते. मात्र, हे पूर्ण सत्य नाही. आयफोनच्या नावातील छोट्या 'i'मागे ॲपलचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांची विशिष्ट संकल्पना, उत्पादनाची ओळख निर्माण करण्याची रणनीती आणि एकापेक्षा अधिक अर्थ दडलेले आहेत.**



## 'i'चा वापर सर्वप्रथम कोणत्या उपकरणात झाला?

आयफोन हे 'i' नाव वापरणारे ॲपलचे पहिले उत्पादन नव्हते. या परंपरेची सुरुवात १९९८ मध्ये 'iMac' या संगणकापासून झाली. त्या काळात ॲपल आर्थिक अडचणींचा सामना करत होती. याच काळात स्टीव्ह जॉब्स ॲपलमध्ये पुन्हा परतले आणि त्यांनी कंपनीला नव्या दिशेने नेणाऱ्या उत्पादनांची निर्मिती सुरू केली. त्यातील महत्त्वाचे उत्पादन म्हणजे iMac. iMacच्या सादरीकरणावेळी स्टीव्ह जॉब्स यांनी उत्पादनाच्या नावातील छोट्या 'i'मागील संकल्पना स्पष्ट केली. त्यानंतर ॲपलच्या अनेक उत्पादनांच्या नावापूर्वी 'i' वापरण्याची परंपरा सुरू झाली.

## स्टीव्ह जॉब्स यांनी सांगितले होते 'i'चे पाच अर्थ

iMacच्या सादरीकरणावेळी स्टीव्ह जॉब्स यांनी एका स्लाइडद्वारे छोट्या 'i'चे पाच वेगवेगळे अर्थ स्पष्ट केले होते. त्यातील पहिला अर्थ होता Internet अर्थात इंटरनेट. त्या काळात इंटरनेटशी जोडले जाणे तुलनेने अवघड होते. मात्र, iMacच्या माध्यमातून इंटरनेटशी जोडणी करणे अधिक सोपे करण्यात आले होते. मात्र, 'i'चा अर्थ केवळ इंटरनेट एवढाच नव्हता. जॉब्स यांनी त्याचे इतर अर्थही सांगितले होते.

- » Individual - व्यक्ती : वापरकर्त्याची वैयक्तिक ओळख आणि गरज.
- » Instruct - शिकवणे : शिकण्यासाठी आणि शिकवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर.
- » Inform - माहिती देणे : जगभरातील माहितीपर्यंत सहज पोहोच.
- » Inspire - प्रेरणा देणे : वापरकर्त्यांना काहीतरी नवे निर्माण करण्यासाठी प्रेरित करणे.
- » त्यामुळे आयफोनमधील 'i'चा अर्थ केवळ 'इंटरनेट' असा मर्यादित नसून, ॲपलच्या उत्पादनविषयक व्यापक संकल्पनेशी तो जोडलेला आहे.

## iPod आणि पुढे iPhoneपर्यंतचा प्रवास

iMacला मिळालेल्या यशानंतर छोटा 'i' हा ॲपलच्या उत्पादनांच्या नावाची वेगळी ओळख बनला. ॲपलनेही ही ओळख पुढील उत्पादनांमध्ये कायम ठेवली. २००१ मध्ये ॲपलने 'iPod' हा पोर्टेबल संगीत वाजवणारा उपकरण बाजारात आणले. त्यानंतर ९ जानेवारी २००७ रोजी स्टीव्ह जॉब्स यांनी पहिल्या iPhoneची घोषणा केली. iPhoneच्या संकल्पनेत इंटरनेटशी जोडणारे उपकरण, स्पर्शपटलावर चालणारा iPod आणि दूरध्वनी अशा तीन प्रमुख सुविधांचा संगम करण्यात आला होता. त्यामुळे 'iPhone' हे नाव ॲपलच्या आधीपासूनच्या 'i' परंपरेशी सुसंगत ठरले.

## नंतर उत्पादनांमधून 'i' का गायब झाले?

काळ बदलला आणि इंटरनेटचा वापर सर्वसामान्य झाला. त्यामुळे ॲपलच्या प्रत्येक उत्पादनाच्या नावात 'i' वापरण्याची गरजही राहिली नाही. यामुळे Apple Watch, Apple TV आणि Apple Vision Pro यांसारख्या तुलनेने नव्या उत्पादनांच्या नावांमध्ये 'i'चा वापर करण्यात आलेला नाही. मात्र, iPhoneच्या नावातील छोटा 'i' आजही ॲपलच्या इतिहासाची आणि ब्रँडच्या सुरुवातीच्या संकल्पनेची आठवण करून देतो. त्यामुळे त्याचा अर्थ केवळ 'इंटरनेट' एवढाच नसून, व्यक्ती, शिक्षण, माहिती आणि प्रेरणा यांच्याशीही तो जोडलेला आहे.

# AI एजंटच्या संशयास्पद हालचालींमुळे 100 हून अधिक कंपन्यांना इशारा

## OpenAIकडून संबंधित संस्थांना सूचना

**'ChatGPT'ची निर्मिती करणाऱ्या OpenAI कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील सुरक्षेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. कंपनीने आपल्या AI प्रणालीशी संबंधित अनधिकृत किंवा संशयास्पद हालचाली आढळल्याने १०० हून अधिक कंपन्या आणि संस्थांना याबाबत सूचना दिल्याचे म्हटले आहे.**



जुलै महिन्यात 'Hugging Face' या संकेतस्थळावर झालेल्या कथित AI हल्ल्याच्या प्रयत्नानंतर OpenAIकडून आपल्या AI प्रणालींच्या सुरक्षेची अधिक काटेकोरपणे तपासणी केली जात आहे. या तपासणीदरम्यान काही AI प्रणालींनी अपेक्षेपेक्षा वेगळ्या पद्धतीने इंटरनेटवरील साधने आणि प्रणालींचा वापर केल्याचे कंपनीच्या निदर्शनास आले. OpenAIने आपल्या ब्लॉगमधून सांगितले की, AI एजंटशी संबंधित अनधिकृत हालचालींचा परिणाम झालेल्या १०० हून अधिक कंपन्या आणि संस्थांना त्याबाबत माहिती देण्यात आली आहे. AI एजंट म्हणजे वापरकर्त्याच्या सूचनेनुसार विविध कामे करण्यासाठी इंटरनेट, संकेतस्थळे आणि संगणकीय साधनांचा वापर करू शकणारी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली. अशा प्रणालींचा वापर वाढत असताना त्यांच्या स्वायत्त हालचाली आणि सुरक्षेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

## परवानगीशिवाय प्रणालींमध्ये प्रवेश?




OpenAIच्या माहितीनुसार, एखाद्या संस्थेच्या प्रणालीमध्ये त्याच्या AI मॉडेलने परवानगीशिवाय प्रवेश केल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेला त्याची माहिती दिली जात आहे. मात्र, असा इशारा देण्यात आला म्हणजे संबंधित कंपनीची संगणकीय प्रणाली हॅक झाली किंवा वैयक्तिक माहितीची चोरी झाली, असा थेट अर्थ होत नाही, असे OpenAIने स्पष्ट केले आहे. काही प्रकरणांमध्ये AI मॉडेलने इंटरनेटचा असा वापर केला, ज्याची अपेक्षा कंपनीने केली नव्हती.

## 'Hugging Face' प्रकरणानंतर तपासणीला वेग

जुलैमध्ये 'Hugging Face'च्या प्रणालीवर AI एजंटच्या माध्यमातून हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले होते. या घटनेत सुमारे ७०० AI एजंटनी प्रणालीमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, OpenAIने स्पष्ट केले आहे की, आतापर्यंत तपासणीदरम्यान 'Hugging Face' प्रकरणासारखी घटना आपल्या AI प्रणालींशी संबंधित असल्याचे आढळलेले नाही. कंपनीकडून सध्या AI प्रणालींच्या हालचालींचे व्यापक पातळीवर परीक्षण सुरू आहे.

## सुमारे 50 पेटाबाइट माहितीची तपासणी



OpenAIकडून तपासण्यात येत असलेल्या माहितीचे प्रमाण तब्बल ५० पेटाबाइट असल्याचे कंपनीने सांगितले आहे. हे प्रमाण किती मोठे आहे, हे स्पष्ट करताना कंपनीने उदाहरण दिले आहे. हा संपूर्ण डेटा साध्या इंग्रजी पुस्तकांमधील मजकूराच्या स्वरूपात असता, तर एखाद्या व्यक्तीला तो अखंड दिवस-रात्र वाचून पूर्ण करण्यासाठी सुमारे ६ कोटी ६० लाख वर्षे लागली असती. इतक्या मोठ्या प्रमाणातील माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी OpenAI सुमारे ७,००० उच्च क्षमतेच्या GPU संगणकांचा वापर करत आहे. या प्रक्रियेवर दररोज सुमारे ५ लाख डॉलर, म्हणजेच ४ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या घडामोडींमुळे AI एजंटना इंटरनेट आणि विविध संगणकीय प्रणालींमध्ये प्रवेश देताना आवश्यक सुरक्षा मर्यादा, परवानग्या आणि देखरेख यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# Zohoची नवी चाल...

## 'Arattai for Business' ॲप लाँच, WhatsApp Businessला पर्याय?

**भारतीय व्यवसाय आणि ग्राहकांमधील संवाद अधिक सुलभ करण्यासाठी Zohoचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी 'Arattai for Business' ॲप आणि व्यासपीठ अधिकृतपणे सुरू केले आहे. Metaने १ ऑक्टोबरपासून WhatsApp Business मधील काही उपयुक्तताविषयक संदेशांसाठी शुल्क लागू केल्यानंतर Zohoने ही सेवा सुरू केली आहे. 'Arattai for Business'च्या माध्यमातून व्यवसायांना ग्राहकांशी संवाद साधणे सोपे होणार आहे. यासोबतच Zohoने स्वतंत्र Arattai Business Platform ही सुरू केले आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून व्यावसायिक सॉफ्टवेअर आणि स्वयंचलित प्रणाली Arattaiशी जोडता येणार आहेत. सध्या Zohoने 'Arattai for Business'साठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची अधिकृत घोषणा केलेली नाही.**




- » श्रीधर वेम्बू यांनी दिली माहिती : श्रीधर वेम्बू यांनी आपल्या अधिकृत 'एक्स' खात्यावर पोस्ट करून 'Arattai for Business'ची माहिती दिली. त्यांच्या माहितीनुसार, सरकार आणि रेल्वेसारख्या सार्वजनिक सेवांसाठी Arattaiचे व्यावसायिक व्यासपीठ विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नव्या प्रणालींना एकमेकांशी जोडण्याचे काम सध्या सुरू असून, ही सुविधा पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी निश्चित कालमर्यादा अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.
- » आरोग्यसेवा क्षेत्रासाठीही विनामूल्य संदेशसेवा : Zohoच्या माहितीनुसार, आरोग्यसेवा क्षेत्रातील संस्था तसेच इतर काही संस्थांना दर महिन्याला १० लाख संदेश विनामूल्य पाठवण्याची सुविधा दिली जाणार आहे. Arattai for Business हे ॲप गेल्या महिन्यात प्रथम Google Play Storeवर आढळले होते. आता ते डाउनलोडसाठी उपलब्ध झाले आहे. हे ॲप भारतात विकसित करण्यात आले असून भारतीय व्यवसायांच्या गरजा लक्षात घेऊन त्याची रचना करण्यात आल्याचे Zohoकडून सांगण्यात आले आहे. या व्यासपीठामध्ये एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड संदेशवहन, विविध उपकरणांवर माहिती आणि संभाषणाचे समक्रमण यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.
- » WhatsApp Businessला पर्याय निर्माण होणार? : व्यवसाय आणि ग्राहकांमधील संदेशवहनासाठी WhatsApp Businessचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, Metaने १ ऑक्टोबरपासून WhatsApp Businessमधील काही उपयुक्तताविषयक संदेशांसाठी शुल्काच्या नियमांमध्ये बदल केले आहेत. अशा परिस्थितीत Arattai for Businessमधील सरकारी, शैक्षणिक आणि आरोग्यसेवा क्षेत्रासाठी प्रस्तावित विनामूल्य संदेशसेवा व्यवसाय आणि संस्थांसाठी पर्यायी व्यासपीठ उपलब्ध करून देऊ शकते. विशेषतः नियमितपणे मोठ्या प्रमाणात संदेश पाठवणाऱ्या संस्थांसाठी संदेशवहनाचा खर्च हा महत्त्वाचा मुद्दा ठरू शकतो. त्यामुळे Arattaiच्या नव्या व्यावसायिक सेवेचा वापर किती वाढतो आणि त्याचा WhatsApp Businessच्या वापरावर किती परिणाम होतो, हे पुढील काळात स्पष्ट होईल. मात्र, Arattai for Businessची शुल्करचना, उपलब्ध सुविधा आणि मोठ्या प्रमाणावरील वापराची क्षमता याबाबत Zohoकडून अद्याप अधिक तपशील जाहीर होणे बाकी आहे.

# १ कोटींची लाच मागितली, ५० लाख घेताना नातेवाईक जाळ्यात; CPWD च्या कार्यकारी अभियंत्यासह ५ जणांना अटक



**मुंबई (प्रतिनिधी)** – सरकारी खात्यात लाचप्रकरणी सध्या एसीबीकडून जोरदार कारवाया सुरू आहेत. त्यातच, मुंबईतील CPWD च्या कार्यकारी अभियंत्यासह ५ जणांना उइख कडून अटक करण्यात आली आहे. वडाळ्यातील भूखंडासाठी छजउ देण्यासाठी १ कोटींची लाच मागितल्याचा आरोप संबंधित अधिकाऱ्यांवर करण्यात आला आहे. या व्यवहारात लाचेची रक्कम ७० लाखांवर ठरली, त्यापैकी ५० लाख रुपये स्वीकारताना आरोपींना अटक करण्यात आली. उझथऊ अभियंत्याचा नातेवाईक ५० लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडला असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबईतील वाशी येथे लाच प्रकरणात कार्यकारी अभियंत्यालाही अटक करण्यात आली, मुंबईतील रिअल इस्टेट ग्रुपचा उपाध्यक्ष, मॅनेजर आणि NOC मागणाऱ्या फर्मचा पार्टनरही अटकेत आहे. याप्रकरणात ५० लाख रुपयांची लाच रक्कमही एसीबीकडून जप्त करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना डिस्पॅच रजिस्टरमध्ये नोंद न करता ५० लाखांच्या बदल्यात भूखंडासाठी NOC दिल्याचे तपासात समोर आले. तसेच, उर्वरित २० लाख रुपये आठवड्यानंतर देण्याचे ठरले होते.

दरम्यान, या कारवाईनंतर एसीबीने मुंबई, नवी मुंबई आणि पुण्यातील आरोपींच्या ठिकाणी छापे टाकले असून लाचेच्या ५० लाखांव्यतिरिक्त ५३.८७ लाखांची रोकड, मालमत्तेशी संबंधित कागदपत्रेही जप्त केली आहे. आत्तापर्यंत याप्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली असून आज मुंबई उइख विशेष न्यायालयात हजर करण्यात आले.

दरमयान, दोन दिवसांपूर्वीच गोवंडी येथील एका सार्वजनिक शौचालयाच्या सफाईचे प्रलंबित बिल मंजूर करण्यासाठी तब्बल ३ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दोन अधिकाऱ्यांसह एका खासगी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराने लाच देण्यास स्पष्ट नकार देत एसीबीकडे धाव घेतली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

## ‘एफडीए’ची ‘सिपला’फार्मा कंपनीवर कारवाई

# गोदामातील औषध विक्री परवानेच केले रद्द




**पुणे (प्रतिनिधी)** – अन्न-औषध प्रशासनाने औषधांची सुरक्षितता, गुणवत्ता, योग्य साठवणूक तसेच औषध विक्री आणि वितरणातील वैधानिक अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने कारवाई केली जात आहे. सिप्ला फार्मा अँड लाईफ सायन्सेस लि. कंपनीच्या पुण्यातील वडकीतील गोदामाच्या औषध विक्री परवान्याच्या संदर्भातील प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या Writ Petition No. 11376/2026 मधील निर्देशांच्या अनुषंगाने विभागाने आवश्यक ती पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून पूर्वीची कार्यवाही मागे घेण्यात आली आहे. ४ सप्टेंबर २०२६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. संस्थेने ११ सप्टेंबर २०२६ रोजी लेखी उत्तर सादर केले. २१ सप्टेंबर २०२६ रोजी वैयक्तिक सुनावणीची संधी देण्यात आली. संस्थेचे लेखी उत्तर, सुनावणीतील म्हणणे, तपासणीतील निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून संस्थेचे वडकी, पुणे येथील सी. एफ. ए. घाऊक औषध विक्री परवाने रद्द आदेश सहाय्यक आयुक्त (औषधे), परिमंडळ- ३ तथा परवाना प्राधिकारी, अन्न- औषध प्रशासन, पुणे यांनी १ ऑक्टोबर २०२६ रोजी पारित केला आहे.

यामुळे सदर निर्णय हा केवळ पूर्वीच्या कारवाईची पुनरावृत्ती नसून, न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून घेतलेला स्वतंत्र नियामक निर्णय आहे. कंपनीला सुनावणीची संधी देण्यात आली. लेखी उत्तर, सुनावणीतील मांडणी, तपासणीतील निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून सकारण आदेश पारित करण्यात आला. कंपनीविरोधात, रिक्शन प्लस औषधासंदर्भात मिसब्रँडिंगची तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुण्यातील वडकी येथील गोदामाच्या तपासणीदरम्यान Reactin Plus (Schedule H) औषधाचा साठा आढळून आला. त्या औषधावर डोकेदुखी, सांधेदुखी, स्नायुदुखी, पाठ दुखी, दात दुखी यांसह वेगवेगळ्या वेदनांपासून त्वरित आराम मिळेल, अशी जाहिरात करण्यात आली होती.

औषधाच्या बॉटलीवर मानवी आकृती दाखवून ह्या औषधाच्या वापराने स्नायू मधील दुखणे कमी होते असे दर्शवण्यात आले होते. औषधाच्या बॉक्सवर असलेले दावे, मजकूर आणि चित्रण याबाबत लागू असलेल्या वैधानिक तरतुदींचे अनुपालन न झाल्याचे निदर्शनास आले. या बाबीच्या अनुषंगाने औषध- सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० अंतर्गत मिसब्रँडिंगचा मुद्दा निर्माण झाला होता आणि त्याबाबत आवश्यक नियामक कार्यवाही करण्यात आली. औषधे सौंदर्य प्रसाधने नियमानुसार औषध बाजारात आणणाऱ्या कंपनीची जबाबदारी विचारात घेण्यात आली. केवळ उत्पादकाची जबाबदारी दाखवून कंपनी म्हणून असलेल्या वैधानिक जबाबदारीपासून संबंधित आस्थापना मुक्त होऊ शकत नाही, असा निष्कर्ष परवाना प्राधिकरणाने नोंदविला आहे. तपासणीदरम्यान अन्न- औषध प्रशासनाच्या अनेक बाबी निदर्शनास आल्या.

## ५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक

# तिसऱ्या दिवशी २ उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल; २० इच्छुकांनी घेतले ४० नामनिर्देशन पत्रे

### आतापर्यंत ६६ इच्छुकांना ११५ नामनिर्देशन पत्रांचे वितरण

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ साठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या आज तिसऱ्या दिवशी २० इच्छुक अर्जदारांना एकूण ४० नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच, आज दोन उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

आज नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांमध्ये कृष्णा त्रिंबकराव पवार (महा जनता परिवर्तन पार्टी) आणि बाळासाहेब भुजंगराव उगले (अपक्ष) यांचा समावेश आहे. नामनिर्देशन प्रक्रिया सुरू झाल्यापासून आजअखेर एकूण ६६ इच्छुक व्यक्तींना ११५ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यापैकी आजअखेर दोन उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी, ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ यांच्याकडे नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत विभागीय आयुक्त कार्यालयातील नामनिर्देशन कक्ष नामनिर्देशन पत्रांचे वाटप व स्वीकारण्यासाठी सुरू राहणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार ६ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. ७ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार असून, ९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे.

# विमानातील हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींनी कॅप्टन स्मित मच्छर यांच्याशी साधला संवाद



**मुंबई (प्रतिनिधी)** – फ्लायदुबईच्या विमानात कॉकपिटमध्ये झालेल्या हल्ल्यात जखमी झालेले भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छर यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. यावेळी पंतप्रधानांनी संकटाच्या प्रसंगी दाखवलेल्या धैर्याबद्दल मच्छर यांचे कौतुक केले आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात काही दिवसांपूर्वी हा प्रकार घडला. विमान हवेत असताना सहवैमानिकाने कॅप्टन मच्छर यांच्यावर चाकूने हल्ला केल्याची माहिती आहे. या हल्ल्यात मच्छर गंभीर जखमी झाले. मात्र, जखमी अवस्थेतही त्यांनी परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला.

विमानावर नियंत्रण ठेवण्यासाठी कॉकपिटमध्ये पोहोचणे गरजेचे असल्याचे लक्षात आल्यानंतर मच्छर यांनी प्रयत्न करून कॉकपिटचा दरवाजा उघडला. त्यानंतर विमानातील प्रवासी आणि क्रू सदस्यांनी हल्लेखोराला नियंत्रणात आणल्याचे सांगण्यात आले. पुढे विमानाचे सौदी अरेबियातील तबूक येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

# ऐतिहासिक कामगिरी! आशियाई क्रीडा स्पर्धेत अमरावतीच्या कुंकूम मोहोडचा सुवर्णवेध; पदार्पणातच इतिहास रचला




**टोकियो (वृत्तसंस्था)** – भारतीय तिरंदाज धीरज बोम्मादेवरा आणि कुमकुम अनिल मोहोड यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतील मिश्र रिकर्व्ह प्रकारात इतिहास रचलाय. रिकर्व्ह तिरंदाजीच्या महिला सांघिक स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकल्यानंतर, कुमकुम मोहोडने धीरज बोम्मादेवराच्या साथीने भारताला आणखी एक पदक मिळवून दिले. विशेष बाब म्हणजे दक्षिण कोरिया १० वेळा ऑलिम्पिक चॅम्पियन आहे. कोरियन संघ १९७८ पासून एकही अंतिम सामना हरलेला नाही. भारताच्या विजयाची शिल्पकार होती कुमकुम मोहोड, जिने अंतिम क्षणी आपला संयम राखला आणि अचूक नेमबाजी करून भारतासाठी सुवर्णपदक निश्चित केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेत अमरावतीची १७ वर्षीय सुपुत्री कुंकूम अनिल मोहोड हिने भारतीय महिला रिकर्व्ह तिरंदाजी संघातून अप्रतिम कामगिरी करत ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले आहे. अत्यंत रोमहर्षक झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला रिकर्व्ह संघाने (कुमकुम मोहोड, अंकिता भकत आणि कीर्ती) जागतिक विजेत्या आणि १० वेळा ऑलिम्पिक चॅम्पियन असलेल्या दक्षिण कोरियाचा ५-३ असा पराभव केला. शेवटच्या आणि निर्णायक क्षणी कुंकूमने अचूक १० गुणांचा वेध घेत भारताच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले.कुंकूमच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. अशातच आज दुहेरी स्पर्धेत कुंकूम आणि धीरज ब्रह्मदेवरा यांनी सिल्वर पदक पटकावले आहे. तर आता उद्या होणाऱ्या एकेरी तिरंदाजीकडे सगळ्या देशाचं लक्ष लागले आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचं नाव उंचावणारी १७ वर्षीय कुमकुम मोहोड हिने महिलांच्या ‘रिकर्व्ह टीम’ प्रकारात भारताला दक्षिण कोरियावर ५-३ असा विजय मिळवून देत आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिले-वहिले सुवर्णपदक जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली. महाराष्ट्राच्या या तिरंदाजाने दबावाखाली असताना अत्यंत महत्त्वाच्या क्षणी ’१० गुण’ (10s) मिळवले. यात भारताचा ऐतिहासिक विजय निश्चित करणारा अंतिम बाणही समाविष्ट होता.

दक्षिण कोरियाचा संघ विजेतेपदाचा प्रबळ दावेदार म्हणून अंतिम फेरीत उतरला होता. त्यांच्या संघात विद्यमान विश्वविजेत्या खेळाडूंसह जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेली कांग चे-यंग आणि ली व येजिन ओह यांचा समावेश होता. दुसरीकडे, आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिलांच्या ‘रिकर्व्ह टीम’ प्रकाराच्या अंतिम फेरीत भारताने यापूर्वी कधीही धडक मारली नव्हती. तरीही, भारतीय त्रिकुटाने सुरुवातीच्या दोन सेटमध्ये दक्षिण कोरियाला कडवी टक्कर दिली. त्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये त्यांनी सामन्यावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि चौथ्या सेटमध्ये संयम राखून विजय साकारला.

# धर्म आणि राष्ट्र परस्परावलंबी, जगातील आव्हानांवर भारताच्या ज्ञानपरंपरेत मार्ग –मोहन भागवत

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्राचा उद्देश धर्म आहे आणि धर्मच राष्ट्राला टिकवून ठेवतो. धर्म आणि राष्ट्र हे परस्परांवर अवलंबून आहेत. एकाचे अस्तित्व असेल तरच दुसऱ्याचे अस्तित्व टिकू शकते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शुक्रवारी केले. बोरीवली येथे ‘ऑल इंडिया विहार सेवा ग्रुप’च्या १४ व्या परिषदेत ते जैन तरुणांसह उपस्थितांना संबोधित करत होते. जग विविध विरोधाभास, संघर्ष आणि टोकाच्या विचारसरणींमुळे अनेक आव्हानांना सामोरे जात असताना त्यावर मार्ग दाखविण्याची क्षमता भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेत असल्याचेही भागवत यांनी सांगितले.

जगासमोर सध्या विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि कौटुंबिक जीवन यांच्यात समतोल साधण्याचे आव्हान आहे. अशा परिस्थितीत मानवतेला दिशा देण्याची क्षमता भारताच्या ज्ञानपरंपरेत असल्याने जग भारताकडे आशेने पाहत असल्याचे भागवत यांनी नमूद केले. भारताने आपल्या ज्ञानाचा प्रसार अन्य देशांवर आक्रमण करून किंवा सक्तीने धर्मपरिवर्तन घडवून केला नाही, असे भागवत म्हणाले. मानवकल्याणाच्या निःस्वार्थ भावनेतून भारताने आपले ज्ञान जगासमोर मांडले. हीच भारताच्या ज्ञानपरंपरेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि भगवद्गीता यांसह जैन आगम, त्रिपिटक आणि गुरुग्रंथ साहिब यांसारख्या ग्रंथांमध्ये मानवतेला दिशा देणारे व्यापक ज्ञान सामावलेले आहे. संतांच्या शिकवणुकीतूनही मानवकल्याण, समरसता आणि सेवाभावाचा संदेश मिळतो. या ज्ञानसंपदेची आज जगाला आवश्यकता असल्याचे भागवत यांनी सांगितले. भारताच्या या ज्ञानपरंपरेचे संरक्षण करणे आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही केवळ धार्मिक जबाबदारी नाही, तर संपूर्ण मानवतेप्रती असलेले कर्तव्य आहे, असेही भागवत यांनी प्रतिपादन केले. संतपरंपरा आणि सेवाभावी वृत्तीचे जतन म्हणजे मानवी समाजाच्या सुरक्षित आणि कल्याणकारी भविष्याचे जतन असल्याचे त्यांनी सांगितले.

# सीजेपीच्या आंदोलनात नसरुद्दीन शाह; अभिजीत दिपकेंना शर्लिन चोपडाचाही पाठिंबा



**मुंबई (प्रतिनिधी)** – दिल्लीनंतर आता महाराष्ट्राच्या राजधानीत कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू असून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. त्यासाठी, आज महात्मा गांधींच्या जयंतीदिनीच सीजेपीने मुंबईतील शिवाजी पार्कवर आंदोलन पुकारले असून मोठ्या संख्येनं तरुणाई आंदोलनात सहभागी होत आहे. विशेष म्हणजे, अभिनेत्री शर्लिन चोपडाने देखील सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होत पाठिंबा दर्शवला आहे. तर, ज्येष्ठ अभिनेते नसरुद्दीन शाह यांनीही सहभागी होत अभिजीत दिपकेचं कौतुक केलंय.

महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचत्य साधत तर दादर येथील शिवाजी पार्क जवळ उगझ कडून आंदोलन केले जात आहे. या आंदोलनाला तरुणाई येऊ लागली आहे. याच आंदोलनात गांधीजींच्या वेष परिधान करुन एक तरुण आंदोलनासाठी पोहचला आहे. सीजीपी आंदोलनासाठी तरुणांची संख्या वाढत आहे, या पार्श्वभूमीवर आता शिवाजी पार्कच्या दिशेने जाणारा रस्ता बंद करण्यात आला आहे. केवळ सेना भवनहून दादर स्टेशन, वांद्रेहून सीएसटीकडे जाणारा रस्ता सुरू ठेवण्यात आला आहे. शिवाजी पार्कच्या दिशेने जणारा रस्ता बॅरिकेटिंग करून बंद करण्यात आला आहे.

दरम्यान, अभिजीत दिपकेंच्या आजच्या आंदोलनात अभिनेते नसरुद्दीन शाह आणि शर्लिन चोपडा यांनीही सहभागी होत पाठिंबा दिला आहे. यावेळी, नसरुद्दीन शाह यांनी दिपकेंचं कौतुक केले, तर मी आपला मोठा फॅन आहे असे अभिजीत दिपकेंनी यावेळी म्हटले. सीजेपी आंदोलनाला तरुणांचा मोठा पाठिंबा आहे तर दुसरीकडे निवृत्तीधारक देखील आंदोलनात सहभागी होताना पाहिला मिळत आहे. आमच्या नातवांच्या भवितव्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो असून आम्ही दिल्लीला झालेल्या आंदोलनात देखील सहभागी होण्यासाठी जाणार होतो, अशी प्रतिक्रिया ठाण्याहून आलेल्या आणि बँकेतून मॅनेजर पदावरून निवृत्त झालेल्या कृष्णनन कुटुंबीयांनी दिली आहे. ज्ञानेश कुमारला देशाच्या भवितव्यासाठी राजीनामा द्यावाच लागेल अन्यथा आंदोलन आणखी तीव्र होईल असंही राधिका कृष्णन यांनी यावेळी म्हटलं.


## टी.सी. हरवली

माझी प्रेमिला दिगांबर खांबाळकर या नावाची बारावी पासची टी.सी. व इतर कागदपत्र जानापुरी ते सोनखेड प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.– **संपर्क पत्ता – प्रेमिला दिगांबर खांबाळकर रा. वडेपुरी ता. लोहा जि. नांदेड मो.नं. ८०१०७४८९१४**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीरप्रगटन

भोकर येथील दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर यांच्या न्यायालयात

समक्ष श्री. आर.आर. पत्की साहेब दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर जि. नांदेड

किरकोळ अर्ज क्र. २५२/२०२६

१) रुक्मीनबाई राजेश्वरराव देशमुख,
वय- ६० वर्षे, धंदा- घरकाम,
२) शंकरराव राजेश्वरराव देशमुख,
वय- ६० वर्षे, धंदा- शेती,
३) दिलीप राजेश्वरराव देशमुख,
वय- ५५ वर्षे, धंदा- शेती
४) रावसाहेब राजेश्वरराव देशमुख,
वय. ५० वर्षे, धंदा.शेती,
सर्व रा. देवठाणा, ता. भोकर, जि. नांदेड.
५) सुमित्रा महेश टाले,
वय. ४९ वर्षे, धंदा. घरकाम,
रा. शिवाजी नगर, हिंगोली, ता.जि. हिंगोली

विरूध्द

निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ०३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ५ मयत राजेश्वरराव चंपतराव देशमुख यांचे वारस आहेत. मयत राजेश्वरराव चंपतराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक ०४/१२/२०२४ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक ३०/१०/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

आदेशावरून

क. लिपीक | अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर | दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

# बॉक्सिंगमध्ये इतिहास! परवीन हुड्डाचा सुवर्ण पंच; आशियाई स्पर्धेत भारताला मिळाले ७३ वे पदक



**मुंबई (प्रतिनिधी)** – जपानमध्ये सुरू असलेल्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. महिला बॉक्सर परवीन हुड्डा हिने बॉक्सिंगमध्ये सुवर्ण पंच मारत इतिहास रचला आहे. महिलांच्या ६५ किलो वजनी गटातील अंतिम सामन्यात परवीनने चिनी तैपेईच्या चेन निएन चिन हिचा ३-२ असा अटीतटीच्या लढतीत पराभव करत भारतासाठी सुवर्णपदक जिंकले. हे या स्पर्धेतील भारताचे ७३ वे पदक ठरले आहे.

परवीन हुड्डा ही आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक पटकावणारी भारतातील तिसरी महिला बॉक्सर ठरली आहे. तिच्यापूर्वी २०१४ मध्ये दिग्गज मुक्केबाज मेरी कोम हिने तर २०२६ च्या याच स्पर्धेत लवलीना बोरगोहेन हिने सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला होता.

शुक्रवारचा दिवस आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतासाठी अत्यंत यशस्वी ठरला. बॉक्सिंग व्यतिरिक्त तिरंदाजीतही भारतीय महिला संघाने इतिहास रचला आहे. भारतीय महिला तिरंदाजी संघाने दक्षिण कोरियाचे वर्चस्व संपवत आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच मिक्स्ड रिकर्व्ह संघ आणि पुरुष रिकर्व्ह संघानेही चमकदार कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले.


## डिग्री प्रमाणपत्र हरवले

माझी विशाल मोहनराव हंबर्डे या नावाची स.न. २०१८ मध्ये पास झालेली यांत्रिकी, अभियांत्रिकी या विषयात पदवी प्रमाणपत्र विद्यापीठ परिसरामध्ये हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता –**
**विशाल मोहनराव हंबर्डे**
**रा. विष्णुपूरी ता.जि. नांदेड**
**मो.नं. ७२१८८७७२९९**


## Change In Name

My old name is **RIYAZUNNISA** Which now I am changing to my new name **GAYASUNNISA BEGUM MOHAMMED NAIMUDDIN.** henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

**Address:** W/O MOHAMMED NAIMUDDIN
H. NO. 1-13-641 PEERBURHAN NAGAR
GALLI NO 12 NANDED

## Change In Name

My old name is **NAIMUDDIN SHAHBUDDIN** Which now I am changing to my new name **MOHAMMED NAIMUDDIN SHAHABUDDIN** henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address: S/O SHAHABUDDIN H
NO 1-13-641, PEERBURHAN NAGAR
GALLI NO 12 NANDED

## Change In Name

My Old Name is **Khan Faratjahan Chand** which now I am changing as New Name: **Farhat Jaha Shaikh Salman.** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider, the same.

Sign by: Farhat Jaha Shaikh Salman
**Address:** Fareed Building 68, Gram
Panchyat Road, Near Jama Masjid
Wajegaon, Nanded (Maharashtra)-431601
Mob. 8208706223

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ८७६७७७१७०१, ९८६०७२९३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# उपलब्ध चारा सकस करण्यासाठी 'चारा साक्षरता अभियानास' प्रारंभ

## चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अल्प पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी काळात संभाव्य चारा टंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपलब्ध चाऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन व व्यवस्थापन करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात 'चारा साक्षरता अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असून, या अभियानाची सुरुवात आज बिलोली तालुक्यातील मौजे रामतीर्थ येथे करण्यात आली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत प्रगतिशील शेतकरी व पशुपालक गुणवंत शिवाजीराव देगलुरे यांच्या प्रक्षेत्रावर 'निकृष्ट चारा सकस करणे' या विषयावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. संभाव्य चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करून पशुधनास आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या अभियानातून शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**सोयाबीन व हरभरा कुटारावर युरिया–काकवी प्रक्रिया**

रामतीर्थ येथील प्रात्यक्षिकात उपलब्ध सोयाबीन कुटार व हरभरा कुटारावर युरिया व मोलासेस (काकवी) प्रक्रिया करण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष दाखविण्यात आली. या प्रक्रियेमुळे उपलब्ध निकृष्ट चाऱ्याची पौष्टिकता, पाचकता व रुचकरता वाढविण्याच्या पद्धतीची माहिती पशुपालकांना देण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीत नवीन चारा उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असल्याने उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन करणे, त्याची साठवणूक करणे आणि उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे. याबाबतही या वेळी शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**चारा टंचाईच्या काळात शास्त्रीय व्यवस्थापनावर भर**

चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची पौष्टिकता वाढवून त्याचा प्रभावी वापर केल्यास पशुधनासाठी आवश्यक पोषणमूल्ययुक्त चारा उपलब्ध करून देता येतो. त्यामुळे पशुपालकांनी उपलब्ध चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन व संवर्धन करण्याबरोबरच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार चारा प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करावा, हा संदेश या प्रात्यक्षिकातून देण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'चारा साक्षरता अभियान' अंतर्गत जिल्ह्यातील शेतकरी व पशुपालकांना उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर, चारा संवर्धन, प्रक्रिया व व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुधनाचे पोषण अबाधित ठेवण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून जनजागृती व प्रात्यक्षिकांवर भर देण्यात येत आहे.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड पोलिसांची विशेष मोहीम; ४१ लाखांचे ३०५ मोबाईल शोधून मूळ मालकांना परत

## CEIR प्रणाली व तांत्रिक तपासाच्या सहाय्याने यश, पोलीस अधीक्षकांच्या हस्ते वितरण



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील नागरिकांचे हरवलेले आणि चोरीला गेलेले मोबाईल फोन शोधून परत देण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत पोलिसांनी तब्बल ३०५ अँड्रॉईड मोबाईल हस्तगत केले असून, त्यांची अंदाजे किंमत ४१ लाख ३१ हजार रुपये इतकी आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा आदी ठिकाणांहून मोबाईल हरवण्याच्या व चोरीच्या घटना वाढल्याने पोलीस अधीक्षकांनी सायबर पोलीस ठाणे आणि सर्व पोलीस ठाण्यांना विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सायबर पोलिसांच्या पथकांनी मोबाईलचे IMEI क्रमांक, तांत्रिक माहिती आणि केंद्र शासनाच्या CEIR प्रणालीच्या माध्यमातून शोधमोहीम राबवली.

हस्तगत केलेल्या मोबाईलच्या IMEI क्रमांकांची पडताळणी करून मूळ मालकांचा शोध घेण्यात आला. शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या हस्ते ३०५ मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. त्यामुळे नागरिकांची आर्थिक व मानसिक अडचण दूर होऊन त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मोबाईल हरवल्यास किंवा चोरीस गेल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवा. तसेच CEIR पोर्टलवर माहिती भरून मोबाईल ब्लॉक/ट्रेस करा. मोबाईलचा IMEI क्रमांक सुरक्षित जतन करून ठेवा.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिसांनी पार पाडली. नागरिकांच्या मालमत्तेचा शोध घेऊन ती परत मिळवून देण्यासाठी नांदेड पोलीस सदैव प्रयत्नशील असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# महानगरपालिकेच्यावतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेतर्फे दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता 'राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर खासदार अशोकराव चव्हाण यांनी महानगरपालिकेतील आयुक्त, महापौर व अन्य अधिकाऱ्यांशी भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाई संदर्भात आढावा बैठक घेतली.

यावेळी महापालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी, माजी सभापती तथा नगरसेवक किशोर स्वामी, नगरसेवक सतीश देशमुख, अभिषेक सौदे, साहेबराव गायकवाड, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त गंगाधर ईरलोड, अजितपालसिंग संधू, नितीन गाढवे, मुख्य लेखापरीक्षक आनंद ऐनवाड यांच्यासह मनपाचे कर्मचारी व शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**पाणी जपून नाही वापरल्यास हाहाकार माजेल -खा. चव्हाण**

नांदेड शहरासह जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण यांनी केले आहे. पाण्याचा वापर जपून न केल्यास आगामी काळात परिस्थिती गंभीर होऊन शहरात हाहाकाराची स्थिती निर्माण होऊ शकते, असा इशाराही त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिला.

# महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोषी देवकुळे, तहसीलदार शंकर लाड, रावसाहेब पोहरे, गजानंद ऐनवाड, गणेश नरहिरे, भास्कर गुंगे, बालासाहेब भराडे, गजानन पोतदार, आशिष सातारे, डॉ स्वाती अलोने, मिरा इंदुरकर,मनिषा पानपट्टे, ज्योती कदम, अनिता काळे, सखू शहाणे, रेखा राठोड , माधुरी ठाकुर यांच्या सह अधिकारी कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्वच्छ भारत दिनी नांदेड रेल्वे विभागाचा अनोखा उपक्रम; कचऱ्याच्या ढिगाऱ्याचे बनवले सुंदर बोनसाई उद्यान



**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागातर्फे 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियान आणि स्वच्छ भारत दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.

दि. २ ऑक्टोबर रोजी डीआरएम कार्यालय संकुल, नांदेड येथून स्वच्छता फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीचे नेतृत्व विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी केले. यावेळी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक सी. एच. कल्याण राजू, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. एम. के. श्रीनिवासा, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेल्वे परिसर आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी जनजागृती करणे हा या फेरीचा उद्देश होता. कचरा संवेदनशील ठिकाणाचे बोनसाई उद्यानात रूपांतर या अभियानातील ठळक उपक्रम म्हणून डीआरएम कार्यालय संकुलातील कचरा संवेदनशील ठिकाणाचे सुंदर बोनसाई उद्यानात रूपांतर करण्यात आले आहे. पूर्वी येथे कचरा, टाकाऊ साहित्य जमा होत असे. या परिसराची स्वच्छता, लँडस्केपिंग आणि वृक्षारोपण करून त्याचे आकर्षक, हिरवेगार उद्यानात रूपांतर करण्यात आले. या 'स्वच्छता लक्ष्य केंद्र' मुळे कार्यालयाच्या सौंदर्यात भर पडली आहे.

स्वच्छता फेरीनंतर वृक्षारोपण आणि स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. तसेच नांदेड विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, वाशीम, पूर्णा, आदिलाबाद आदी ठिकाणीही स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण उत्साहात पार पडले. यात रेल्वे अधिकारी–कर्मचारी, कामगार संघटना, स्काऊट्स अँड गाईड्स आणि एनसीसी कॅडेट्स यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# पेट्रोल पंपाच्या 'एनओसी'साठी लाच मागणाऱ्या लिपिकास एक दिवसाची पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** पेट्रोल पंपाचे काम पूर्ण करून घेण्यासाठी तसेच ना हरकत प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी तक्रारदाराकडून लाचेची मागणी करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या नांदेड कार्यालयातील कनिष्ठ लिपिकासह एका खासगी इसमाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरुवारी (१ ऑक्टोबर) सापळा रचून पकडले. सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ कार्यालयाच्या आवारात सायंकाळी ५.१७ वाजता ही कारवाई करण्यात आली. यावेळी १ लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना खासगी इसमाला रंगेहाथ पकडण्यात आले. अटक करण्यात आलेल्या दोघांनाही न्यायालयासमोर हजर केले असता न्यायाधीश तुषार आगलावे यांनी एक दिवसाच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे.

या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग विभागातील कनिष्ठ लिपीक सुकेश भीमराव नहारे (वय ३४) आणि खासगी इसम सतीश मधुकर वाघोळे (वय ३०) यांच्याविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील सुधारित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

तक्रारदाराच्या पेट्रोल पंपाचे काम लवकर पूर्ण व्हावे आणि ना हरकत प्रमाणपत्र मिळावे, यासाठी संबंधितांकडून वारंवार कागदपत्रांमध्ये त्रुटी काढल्या जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या कामासाठी तक्रारदाराकडे मोठ्या रकमेची लाच मागण्यात आल्याची माहिती एसीबीकडे देण्यात आली. ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर एसीबीच्या पथकाने सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ कार्यालयाच्या प्रांगणात सापळा रचला. या कारवाईदरम्यान खासगी इसम सतीश वाघोळे याने तक्रारदाराकडून १ लाख २० हजार रुपये स्वतःच्या हाताने स्वीकारले. त्याचवेळी पथकाने त्याला ताब्यात घेतले. लोकसेवक सुकेश नहारे यालाही या प्रकरणात ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# देगलूर पोलिसांचा बनावट ग्राहकाचा सापळा; दुचाकी चोरटा जेरबंद, ४ लाखांच्या १० मोटारसायकल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात वाहन चोरीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गत देगलूर पोलिसांनी बनावट ग्राहकाचा सापळा रचून मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीतील एका आरोपीला जेरबंद केले असून, त्याच्याकडून ४ लाख १० हजार रुपये किमतीच्या १० चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत.

पोलीस ठाणे देगलूरचे प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ यांना गोपनीय माहिती मिळाली की, काही युवक नायगाव परिसरातून चोरीच्या मोटारसायकली कमी किमतीत विकण्यासाठी खानापूर येथे येणार आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या आदेशाने गुन्हे शोध पथकाचे पोउपनि हणमंत शिंदे व पथकाने पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली खानापूर फाटा येथे सापळा रचला.

पोलिसांनी एका व्यक्तीला बनावट ग्राहक म्हणून आरोपींकडे पाठवले. रात्री वन्नाळी रोडवर बाभळीच्या झाडाजवळ दोन युवक मोटारसायकल घेऊन आले. खरेदी–विक्रीची चर्चा सुरू असतानाच दबा धरलेल्या पोलिसांनी घेराव घालून एकाला ताब्यात घेतले, तर दुसरा अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.

ताब्यात घेतलेला आरोपी तुकाराम उर्फ बाळू गंगाधर गिरी (वय २५, रा. टाकळगाव, ता. नायगाव) तर फरार झालेला आरोपी शिवकुमार हनमंत कुऱ्हाडे (वय २८, रा. बेळगे नगर, नायगाव). चौकशीत आरोपीने एमआयडीसी परिसरासह इतर ठिकाणी लपवून ठेवलेल्या दुचाकींबाबत माहिती दिली. पोलिसांनी तेथून एकूण १० मोटारसायकली जप्त केल्या. यातील एक दुचाकी देगलूर पोलीस ठाणे गु.र.नं. ४८७/२०२६ आणि दुसरी कंधार पोलीस ठाणे गु.र.नं. ३७३/२०२६ मधील असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# पांडुरंग कोकरे यांचे निधन



**लोहा (प्रतिनिधी) –** विष्णुपुरी येथील रहिवासी पांडुरंग थोरबाजी कोकरे यांचे दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, ४ मुली, १ मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक सुरेश हटकर यांचे मेहुणे होत.

# मारोतराव सोळंके यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील हस्तरा येथील ज्येष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त शिक्षक मारोतराव नागोराव सोळंके यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, १ मुलगी, सुना, नातू असा परिवार आहे. अखिल प्राथमिक शिक्षक संघटना नांदेड जिल्ह्याचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही ते कार्यरत होते. शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी हस्तरा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. जंगमवाडी शहरी रुग्णालयातील पर्यवेक्षक राम सोळंके व व्यावसायिक धनंजय सोळंके यांचे ते वडील होत.

# अवैध गुटखा वाहतूक करणारा जेरबंद, ७.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या मोहिमेंतर्गत भोकर पोलिसांनी अवैध गुटखा विक्री व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करत ७ लाख ५८ हजार २८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन यांच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम सुरू आहे. दि. २९ सप्टेंबर रोजी भोकर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना गोपनीय माहिती मिळाली की, इनामदार गल्ली, सार्वजनिक रोड, भोकर येथे अवैध गुटख्याची वाहतूक होत आहे. माहिती मिळताच पोलीस पथकाने पंचासमक्ष छापा टाकला. यावेळी संशयास्पदरित्या उभी असलेली स्कॉर्पिओ गाडी क्र. (MH-26-N-4137) ची तपासणी केली असता त्यात विविध कंपन्यांचा पानमसाला, गुटखा व सुगंधित तंबाखू आढळून आला.

पोलिसांनी १ लाख ५८ हजार २८८ रुपये किमतीचा गुटखा आणि ६ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ असा एकूण ७ लाख ५८ हजार २८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी आरोपी मोहम्मद मजरोद्दीन मोहम्मद अरोफोद्दीन, वय ३० वर्षे, रा. इनामदार गल्ली, भोकर याच्याविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५२९/२०२६, कलम १२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता आणि कलम २६, २७ अन्न सुरक्षा व मानके कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नवनीतसिंघ गांधी यांची महाराष्ट्र राज्य शीख समन्वयकपदी नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या संघटनात्मक कार्यात महत्त्वाची जबाबदारी सोपवत, नवनीतसिंघ गांधी यांची महाराष्ट्र राज्य शीख समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार इम्रान प्रतापगढी यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील शीख समाजाशी संवाद व समन्वय साधणे, समाजातील विविध प्रश्न व अपेक्षा पक्षाच्या नेतृत्वापर्यंत पोहोचविणे तसेच पक्ष आणि शीख समाजामधील समन्वय अधिक दृढ करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी नवनीतसिंघ गांधी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल नवनीतसिंघ गांधी यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष इम्रान प्रतापगढी, उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र प्रभारी अहमद खान, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष व अकोला मतदारसंघाचे आमदार साजिद पठाण तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे आभार मानले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com